VIVEKANAND
S46313



# प्रकरण १

# १९ व्या शतकाच्या प्रारंभीची महाराष्ट्रातील राजकीय, सामाजिक, आर्थिक व धार्मिक परिस्थिती

महाराष्ट्राच्या तसेच संपूर्ण भारताच्या इतिहासात १९ वे शतक हे महत्त्वाचे व वैशिष्ट्यपूर्ण असे शतक होते. या शतकाच्या प्रारंभीच भारतात इंग्रजी सत्ता स्थिर झाली. इंग्रजांनी महाराष्ट्रातील उरलीसुरली मराठी सत्तासुद्धा संपविली. युगपुरुष छत्रपती शिवाजी महाराजांनी १७ व्या शतकात स्थापन केलेल्या हिंदवी स्वराज्याला महाराष्ट्र कायमचा पारखा झाला. महाराष्ट्रात घडून आलेल्या या राजकीय परिवर्तनाचे दूरगामी परिणाम येथील समाजाच्या व समाजजीवनाच्या सर्वच अंगांवर झाले. महाराष्ट्रात नव्या युगाची सुरुवात झाली. पेशवेकाळातील महाराष्ट्राच्या राजकीय जीवनातील अशांतता व अराजकता, अनास्था व अनाचार संपून इंग्रजांच्या राजवटीत सुनियोजित व सुव्यवस्थित अशा कार्यक्षम शासनपद्धतीस प्रारंभ झाला. ब्रिटिश राज्यकर्त्यांनी या देशातील प्रजेबरोबर एक वेगळा विचारप्रवाह व प्रयोग सुरू केला. वर्णव्यवस्था, जातिव्यवस्था, श्रेष्ठत्व--कनिष्ठत्व इ. प्रतिगामी विचारांनी जखडलेल्या; अनेक वाईट चालीरीती, रूढी व परंपरा यांनी बांधल्या गेलेल्या येथील समाजाला सामाजिक समतेचा नवा संदेश त्यांनी दिला. इंग्रजी राजवटीच्या आगमनाने या देशात नव्या विचारांचे वारे वाहू लागले. परिणामी जुन्या चालीरीती, रूढी, परंपरा, अंधश्रद्धा, जातिव्यवस्था इत्यादींवर मोठ्या प्रमाणात आघात होऊ लागले. सर्व समाज एक प्रकारच्या संक्रमणावस्थेतून वाटचाल करू लागला. येथील समाजाला नवा साक्षात्कार झाला. या परिवर्तनामुळे येथील धार्मिक, सामाजिक, आर्थिक व सांस्कृतिक जीवन ढवळून निघाले. पाश्चात्त्यांचे आधुनिक, वैज्ञानिक, प्रगत व पुरोगामी विचार आत्मसात करणे येथील समाजाला जड गेले. त्यामुळे सामाजिक, धार्मिक व सांस्कृतिक परिवर्तनात अनेक अडसर निर्माण झाले. येथील समाज आपली परंपरागत चालत आलेली जुनी संस्कृती सोडण्यास सहजासहजी तयार नव्हता, तर दुसऱ्या बाजूला परिस्थितीच्या दबावामुळे होऊ घातलेल्या परिवर्तनाला तो रोखूही शकत नव्हता. अशा प्रकारे या समाजाची झालेली ही कोंडी फोडण्याचे महत्त्वाचे कार्य याच शतकात झाले. इंग्रजांच्या परकीय सत्तेचे राजकीय स्वरूप वेगळे व आकर्षक असले तरी यामागचा त्यांचा आर्थिक हेतू वेगळाच आहे याची जाणीव काही समाजसुधारकांना याच काळात झाली. राजकीय, सामाजिक, धार्मिक, आर्थिक व सांस्कृतिक जीवनातील आधुनिक व प्रगत प्रेरणांचा स्वीकार केल्याशिवाय आपल्या समाजाचा सर्वांगीण विकास होणार नाही याची जाणीव महाराष्ट्रातील समाजात निर्माण करण्याचे काम या कालखंडाने केले.

१९ व्या शतकाच्या प्रारंभी महाराष्ट्रातील समाजाच्या राजकीय, सामाजिक व आर्थिक जीवनात नवे युग उदयास आले. म्हणूनच या शतकाच्या प्रारंभीच्या राजकीय, सामाजिक व आर्थिक परिस्थितीचा सखोल अभ्यास करणे आवश्यक ठरते.

**१. महाराष्ट्राचे प्रादेशिक/भौगोलिक वेगळेपण** : भारतातील इतर कोणत्याही प्रांतापेक्षा महाराष्ट्राचे भौगोलिक स्थान हे वैशिष्ट्यपूर्ण आहे. महाराष्ट्र हा डोंगरदऱ्यांचा, पठारांचा व छोट्या नद्यांच्या काठचा सुपीक खोऱ्यांचा प्रदेश आहे. सह्याद्री हा महाराष्ट्राचा भूगोलच नव्हे, तर इतिहास घडविणारा पर्वत आहे. या पर्वताच्या असंख्य रांगा, उंच शिखरे, खोल दऱ्या, घनदाट अरण्य व त्यातील हिंस्र श्वापदे या सर्वांमुळे निर्माण झालेली दुर्गमता हे महाराष्ट्राचे खास भौगोलिक वैशिष्ट्य होय. या वैशिष्ट्यांमुळेच स्वराज्य स्थापनेचा पहिला प्रयत्न येथेच झाला. आपले स्वातंत्र्य दीर्घकाळ टिकविण्याचा प्रयत्न या प्रदेशानेच केला. महाराष्ट्राला आपल्या या वैभवशाली ऐतिहासिक परंपरेचा सार्थ अभिमान आहे.

आजच्या महाराष्ट्र राज्याची निर्मिती १ मे, १९६० रोजी झाली. भाषावार प्रांत रचनेच्या तत्त्वानुसार हे राज्य निर्माण करण्यात आले. सर्व 'मराठी भाषिक' प्रदेशांचा त्यात समावेश केला. महाराष्ट्राच्या उत्तरेस गुजरात व मध्य प्रदेश, पूर्वेस मध्य प्रदेश व आंध्र प्रदेश, दक्षिणेस आंध्र प्रदेश, कर्नाटक व गोवा ही राज्ये आहेत. पश्चिमेला अरबी समुद्र आहे. आजच्या महाराष्ट्राचे कोकण, देश, मराठवाडा व विदर्भ हे प्रमुख चार विभाग आहेत. इंग्रजी राजवटीत कोकण व देश या विभागांचा पूर्वीच्या मुंबई इलाख्यात समावेश केलेला होता. मराठवाड्याचा समावेश निजामाच्या हैद्राबाद संस्थानात होता, तर विदर्भाचा प्रदेश मध्य प्रांत व बिदरच्या राज्यांशी जोडलेला होता. महाराष्ट्राला भौगोलिक विविधता लाभली आहे. पश्चिम किनारपट्टीवर समुद्रसपाटीचा प्रदेश, तर किनाऱ्यापासून २०-२५ मैलांवर ४००० फूट उंचीचा प्रदेश, काही ठिकाणी २५०-३०० इंच पाऊस तर काही ठिकाणी १५-२५ इंच पाऊस, काही ठिकाणी डोंगर-पठारे, माळराने तर काही ठिकाणी सुपीक खोरी, काही ठिकाणी कुसळी गवताचा व दगडधोड्यांचा नापीक प्रदेश तर काही ठिकाणी हुकमी पिकाची काळीभोर जमीन असणारा प्रदेश अशा विविधतेने नटलेल्या महाराष्ट्राचे भौगोलिक वेगळेपण आहे.

**२. महाराष्ट्राचा इतिहास** : महाराष्ट्राला वैभवशाली ऐतिहासिक परंपरा लाभली आहे. आधुनिक काळात करण्यात आलेल्या उत्खनन व संशोधनावरून महाराष्ट्राच्या प्राचीन इतिहासाची माहिती मिळते. गोदावरी, प्रवरा नद्यांच्या काठी नाशिक व गंगावाडी येथे जुन्या अश्मयुगातील मानवी वसाहतीचे संदर्भ मिळतात. येथे तीस ते चाळीस लक्ष वर्षांपूर्वी या मानवी वसाहती होत्या हे सिद्ध झाले आहे. संगमनेरजवळ जोर्वे येथे नव पाषाण युगातील संस्कृतीचे अवशेष मिळाले आहेत. कोल्हापूरमधील ब्रह्मपुरी येथे व कराडमध्ये झालेल्या उत्खननात मिळालेल्या अवशेषावरून दोन हजार वर्षांपूर्वीच्या सांस्कृतिक जीवनाचे ज्ञान होते. प्राचीन मानवी वसाहती, समाज व त्यांच्या सांस्कृतिक प्रगतीची माहिती देणारी ही ठिकाणे महाराष्ट्रात मिळतात. आज महाराष्ट्र म्हणून ओळखला जाणारा प्रदेश प्राचीन काळी दंडकारण्य म्हणून ओळखला जात होता. या दंडकारण्याचा समावेश 'दक्षिणपथ' मध्ये होत

होता. इ. स. पूर्व काळात उत्तरेत आर्यावर्तात स्थिरावलेल्या आर्यांनी दक्षिणपथातील दंडकारण्यात प्रवेश करून येथे वस्ती करण्यास प्रारंभ केला. या दंडकारण्याच्या प्रदेशात राहणाऱ्या लोकांना मरहट्ट, मरहठ्ठ, महारठ्ठ अशा अनेक वेगवेगळ्या नावांनी ओळखले जाऊ लागले. महारठ्ठ या प्राकृत रूपावरूनच महाराष्ट्र हे नाव प्राप्त झाले असावे. महारठ्ठ हे संबोधन हा प्रदेश, प्रांत व त्यात राहणारे लोक या दोघांच्या बाबतीत वापरले जात होते. महाराष्ट्राची लोकभाषा 'महाराष्ट्री' मराठी ही होय. प्राचीन काळात एक प्राकृत भाषा म्हणून मराठीला मान्यता प्राप्त झाली होती.

विविध संस्कृत व प्राकृत ग्रंथांत दक्षिणपथ व दंडकारण्याचे उल्लेख मिळतात. पुराणांमध्ये या प्रदेशातील जानपदांची नावे मिळतात. तथापि, या प्रदेशाच्या राजकीय इतिहासाची माहिती मिळत नाही. त्यानंतर भारतात स्थापन झालेल्या मौर्यांचे राजकीय वर्चस्व या प्रदेशात असावे. आपल्या कारकिर्दीच्या शेवटी चंद्रगुप्ताने जैन धर्माचा स्वीकार करून तो दक्षिणेत आल्याची माहिती मिळते. बिंदुसाराने आक्रमण करून हा प्रदेश जिंकल्याची माहिती तामिळी साहित्यात आढळते. अशोकाच्या शिलालेखात आलेल्या वर्णनावरून महाराष्ट्राचा प्रदेश मौर्य साम्राज्यात समाविष्ट होता असे दिसते. नंतरच्या काळात महाराष्ट्रावर इ. स. पू. २२२ ते इ. स. २२८ पर्यंत सातवाहनांची स्वतंत्र सत्ता होती. गोदावरीचे खोरे हा या साम्राज्याचा गाभा होता. त्यांच्या साम्राज्यात सौराष्ट्र-राजस्थानचा आग्नेय भाग, माळवा व महाराष्ट्र इत्यादी प्रदेशांचा समावेश होता. सातवाहनकालीन राजकीय शांततेमुळे या साम्राज्याचा सर्वांगीण विकास झाला. पैठण व तेर या ठिकाणांना प्रसिद्ध व्यापारी केंद्रे म्हणून महत्त्व प्राप्त झाले होते. पुढील काळात संपूर्ण महाराष्ट्राच्या प्रदेशावर एकसंधी राजकीय वर्चस्व प्रस्थापित करणारी सत्ता निर्माण झाली नाही. नंतरच्या काळात नहपाण क्षत्रपाने राजस्थानचा काही भाग, माळव्याचा पश्चिम भाग, गुजरात, सौराष्ट्र, कोकण व उत्तर महाराष्ट्राचा प्रदेश आपल्या आधिपत्याखाली आणला. पण सातवाहन राजा गौतमीपुत्र सातकर्णी याने शक क्षत्रपांचा पराभव करून महाराष्ट्र व माळव्यात आपली सत्ता पुन्हा प्रस्थापित केली. सातवाहनांच्या विनाशापर्यंत उत्तर कोकण व महाराष्ट्राच्या प्रदेशासाठी सातवाहन व शक क्षत्रपांमध्ये संघर्ष होता. या राजकीय अस्थिरतेच्या काळात निरनिराळ्या प्रदेशांत तेथील अधिकाऱ्यांनी, मांडलिकांनी आपली स्वतंत्र राज्ये स्थापन केली. पुराणात सातवाहनानंतर अभीर, गर्दभिल्ल, यवन, शक, तुषार इत्यादी राज्यकर्त्यांची नावे दिली आहेत. सातवाहनानंतर सातारा, कोल्हापूर, सोलापूर व कर्नाटकचा काही भाग यासह 'उत्तर कुंतल' म्हणून ओळखल्या जाणाऱ्या प्रदेशावर 'राष्ट्रकूट' घराण्यातील सत्ताधीशांनी राज्य केले. विदर्भाच्या प्रदेशावर इ. स. २५०-२६० च्या सुमारास वाकाटकांनी आपली सत्ता स्थापन केली. मराठवाड्याचा प्रदेशही त्यांच्या ताब्यात असावा. वाकाटकांच्या काळात विद्या, कला, साहित्य इत्यादींच्या विकासाला चालना मिळाली. यानंतरच्या काळात राजकीय सत्तेचे केंद्रस्थान कृष्णा-तुंगभद्रेच्या प्रदेशात स्थिर झाले. चालुक्य व राष्ट्रकूट घराण्यातील राजांनी इ. स. ६ व्या ते ११ व्या शतकापर्यंत महाराष्ट्राच्या बहुतेक सर्व भागांवर राज्य केले. बदामी या राजधानीमधून

महाराष्ट्रावर आपले वर्चस्व ठेवणाऱ्या चालुक्य घराण्यातील अकरा राजांनी २२५ वर्षे राज्य केले. तर महाराष्ट्रातील मान्यखेटक ही राजधानी असलेल्या राष्ट्रकूट घराण्यातील चौदा राजांनी महाराष्ट्रात २२० वर्षे राज्य केले. माळव्यातील परमार घराण्यातील राजाबरोबर झालेल्या संघर्षात राष्ट्रकूट सत्ता कमकुवत बनली. नाशिक व गोदावरी यांच्यामध्ये असणाऱ्या 'सेऊण' देशावर मांडलिक असलेल्या यादवांनी आपली स्वतंत्र सत्ता पुढील काळात निर्माण केली. नगर, पुणे व साताऱ्याच्या काही प्रदेशावर त्यांनी आपले राजकीय वर्चस्व स्थापन केले. या घराण्यातील सिंधन या सामर्थ्यशाली राजाने आपले राज्य वाढवून कोकण देश, मराठवाडा व विदर्भ हे प्रदेश आपल्या नियंत्रणाखाली आणले. देवगिरी ही त्यांची राजधानी होती. यादवांचा कालखंड हा महाराष्ट्रात शांततेचा काळ होता. त्यामुळे या काळात विद्या, साहित्य, कला, राजकीय व्यापार यांसारख्या क्षेत्रांत महाराष्ट्रीय समाजाची मोठी प्रगती झाली. इ. स. १२९४ साली अल्लाउद्दीन खिलजीने दक्षिणेत यादवांवर पहिली स्वारी करून त्यांना पराभूत केले. या स्वारीबरोबरच इस्लामी सत्तेचा दक्षिणेत प्रवेश झाला. यानंतर अवघ्या २५ वर्षांत इस्लामी सत्तेने सर्व हिंदू राज्ये नष्ट केली व सर्व दक्षिण तिने आपल्या वर्चस्वाखाली आणला. इ. स. १३४७ मध्ये हसन गंगू बहामनी याने बहामनी राज्याची स्थापना दक्षिणेत केली. सर्व महाराष्ट्रावर बहामनी सुलतानाचे राज्य प्रस्थापित झाले. इ. स. १४९० ते १५२६ या काळात बहामनी राज्याचे तुकडे होऊन पाच स्वतंत्र राज्ये अस्तित्वात आली. वऱ्हाडची इमादशाही, अहमदनगरची निजामशाही, विजापूरची आदिलशाही, बिदरची बरीदशाही व गोवळकोंड्याची कुतुबशाही. यापैकी अहमदनगरची निजामशाही व विजापूरच्या आदिलशाहीचे महाराष्ट्राच्या प्रदेशावर दीर्घकाळ वर्चस्व होते. अनेक पराक्रमी मराठा सरदारांच्या मदतीने या इस्लामी सत्तांनी आपले वर्चस्व कायम टिकवले.

**३. मराठी सत्तेचा उदय व विस्तार :** बहामनी सत्तेच्या स्थापनेपासून सुमारे तीनशे वर्षे महाराष्ट्राच्या भूप्रदेशावर इस्लामी सत्ता होती. या इस्लामी सत्तांनी मराठा सरदारांच्या मदतीने आपली सत्ता टिकविली व वाढविली. 'पातशाही' हिंदूंसाठी नाहीच असे मानणाऱ्या समाजाने या सत्तांची चाकरी इमाने इतबारे केली. बादशहाबद्दल मराठ्यांच्या इतकी स्वामिनिष्ठा मुसलमानांनीसुद्धा दर्शविली नाही. त्यांची मनसबदारी किंवा शिलेदारी स्वीकारून आपल्या वतनवाडीत स्वतंत्र राहावे. आपल्या वतनवाडीपलीकडील जगाची फिकीर करू नये हा या काळातील जनतेचा स्थायिभाव होता. प्रतिकारहीन बनलेल्या या समाजावर या काळात इस्लामी राजवटींनी अनेक अन्याय, अत्याचार केले. जुलूम, जबरदस्ती केली. कमालीचे दुःख, हालअपेष्टा सहन करीत निमूटपणे येथील समाज जगत होता. १७ व्या शतकात युगपुरुष छत्रपती शिवाजी महाराजांनी अत्यंत प्रतिकूल परिस्थितीत मराठ्यांच्या स्वतंत्र राज्याची, स्वराज्याची स्थापना केली. स्वराज्याची स्थापना ही महाराष्ट्राच्या राजकीय, सामाजिक, धार्मिक व सांस्कृतिक जीवनात आमूलाग्र बदल घडवून आणणारी घटना होती. महाराजांनी मराठमोळ्या माणसांचे संघटन करून त्यांना स्वातंत्र्याच्या विचाराने भारावून टाकले. सामान्य मराठी माणसात स्वत्व व स्वाभिमान जागृत करून त्याला स्वराज्य, स्वधर्म, स्वदेश,

Scanned with ACE Scanner

स्वसंस्कृती व स्वभाषा यांच्या रक्षणासाठी लढण्याची व प्रसंगी आत्मसमर्पण करण्याची प्रेरणा दिली. त्यांनी अत्यंत प्रतिकूल परिस्थितीत आदिलशाही, कुतुबशाही व मुघल यांसारख्या प्रबळ सत्तांशी संघर्ष करून मराठी सत्तेला स्थिर पायावर उभे केले. शिवकाळात समाजात स्वातंत्र्य, स्वदेश व स्वधर्म रक्षणाची प्रेरणा इतकी प्रखर होती की, शिवाजी महाराजांच्या मृत्यूनंतर मराठ्यांचे राज्य नष्ट करण्यासाठी सर्व सामर्थ्यानिशी दक्षिणेत आलेल्या औरंगजेबाचा मराठ्यांच्या पुढे टिकाव लागला नाही. छत्रपती संभाजी, छत्रपती राजाराम व महाराणी ताराबाई यांच्या काळापर्यंत स्वराज्य व स्वधर्माच्या रक्षणासाठी प्राणार्पणाची प्रेरणा कायम होती. म्हणूनच मराठे २५ वर्षे औरंगजेबाबरोबर झुंजले. ते लढाया हरले पण युद्ध जिंकले. औरंगजेबाचे मराठी राज्य जिंकून घेण्याचे स्वप्न त्यांनी धुळीस मिळविले. त्याला पराभूत केले. मराठी राज्य राखले. यामागची प्रेरणा ही छत्रपती शिवाजी महाराजांची होती.

छत्रपती शाहूंच्या काळापासून मराठी सत्तेचे स्वरूप बदलले. छत्रपतीची सत्ता कमकुवत बनली. पेशवे प्रबळ बनले आणि मराठी राज्यकारभाराचे प्रमुख झाले. पहिल्या चार पेशव्यांनी मराठ्यांच्या सत्तेचा उत्तर भारतात विस्तार केला. मराठी सत्तेला श्रेष्ठ व सामर्थ्यशाली सत्ता म्हणून स्थान मिळवून दिले. १७६१ च्या तिसऱ्या पानिपत युद्धानंतर या सत्तेला उतरती कळा लागली. तिला पुन्हा वैभवशाली बनविण्याचे पहिल्या माधवराव पेशव्याचे प्रयत्न अपुरे ठरले. त्यानंतरच्या काळात अकार्यक्षम पेशवे सत्तेवर आले. परिणामी, मराठ्यांची सत्ता कमकुवत बनली. बाजीराव दुसऱ्याच्या काळात इंग्रजांनी मराठ्यांचा पूर्ण पराभव करून महाराष्ट्रावर आपले राजकीय वर्चस्व प्रस्थापित केले. इ. स. १८१८ ते १९४७ या सुमारे १३० वर्षांच्या काळात भारतातील प्रजेला पारतंत्र्यात राहावे लागले. छत्रपती शिवाजी महाराजांनी स्वीकारलेल्या ध्येयांचा नंतरच्या काळात पडलेला विसर, राष्ट्रहितापेक्षा स्वहित महत्त्वाचे मानण्याची स्वार्थी वृत्ती, वतनाविषयी वाटणारे विशेष प्रेम, वतनासाठी स्वजनासी संघर्ष, अकार्यक्षमता, दूरदृष्टीचा अभाव, दुर्बल व नीतिशून्य केंद्रसत्ता इत्यादी बाबी मराठ्यांच्या सत्तेच्या विनाशाला कारणीभूत ठरल्या.

**४. इंग्रजी सत्तेचा उदय व विस्तार :** इंग्रज प्रथम व्यापाराच्या उद्देशाने भारतात आले. इ. स. १६०० मध्ये लंडन येथे पूर्वेकडील देशाशी व्यापार करण्यासाठी ईस्ट इंडिया कंपनीची स्थापना केली. या कंपनीने भारतात सुरत, मद्रास, मुंबई व कलकत्ता इत्यादी ठिकाणी आपल्या वखारी स्थापन करून व्यापार करण्यास प्रारंभ केला. भारतासारख्या खंडप्राय देशात व्यापाराच्या वाढीसाठी राजकीय सत्तासुद्धा आपल्याकडे असणे आवश्यक आहे याची जाणीव धूर्त इंग्रजांना झाली. इंग्रजांच्या सुदैवाने १८ व्या शतकाच्या उत्तरार्धात भारतात त्यांना रोखणारी, प्रखर विरोध करणारी कोणतीही बलवान सत्ता नव्हती. या संधीचा अचूक फायदा इंग्रजांनी घेतला. प्रभावी मध्यवर्ती सत्तेचा अभाव, अनेक सत्ताधीशांमध्ये असलेले आपापसातील संघर्ष, त्यातून आलेली कमकुवतता या बाबी इंग्रजांना अनुकूल ठरल्या. इंग्रजांनी आपले प्रगत व वैज्ञानिक तंत्रज्ञान, सुधारलेली शस्त्रास्त्रे तसेच फितुरी, आर्थिक संपन्नता, अधिकाऱ्यांची कार्यक्षमता, मुत्सद्देगिरीच्या जोरावर कंपनीने भारतात आपली राजकीय सत्ता स्थापन केली.

Scanned with ACE Scanner

इ. स. १७५७ च्या प्लासीच्या लढाईत विजय मिळवून इंग्रजांनी बंगाल प्रांतात आपल्या राजकीय सत्तेचा पाया घातला. क्लाईव्ह, वॉरन हेस्टिंग्ज या गव्हर्नरनी आपल्या कुशल मुत्सद्देगिरीने व धाडसाने इंग्रजी सत्तेचा भारतात विस्तार केला. स्थानिक सत्तांचे दुबळेपण व त्यांच्यातील ऐक्यभावनेचा अभाव हे इंग्रजांच्या विजयाचे एक महत्त्वाचे कारण होय. लॉर्ड वेलस्लीने इंग्रजी सत्तेच्या विस्तारासाठी आक्रमक धोरणाचा स्वीकार केला. त्याने आपल्या सुप्रसिद्ध 'तैनाती फौजे'चा अनेक भारतीय सत्ताधीशांना स्वीकार करण्यास भाग पाडले. त्यांना कायमचे ब्रिटिशांचे अंकित बनविले. इंग्रज भारतात राजकीय सत्ता प्रस्थापित करत असताना त्यांना फ्रेंच, डच व पोर्तुगीज या युरोपियन स्पर्धकांनासुद्धा पराभूत केले. भारतात १८ व्या शतकाच्या उत्तरार्धात इंग्रजांना विरोध करणारी मराठ्यांची एकमेव सत्ता होती. पण याच शतकाच्या शेवटच्या दशकात सवाई माधवराव, महादजी शिंदे, नाना फडणवीस या कर्त्या पुरुषांच्या मृत्यूने पेशवाईतील कर्तबगार पिढी संपली. दुसरा बाजीराव पेशवा झाला. त्याच्या अंगी कसलेही कर्तृत्व नव्हते. दुर्गुण मात्र भरपूर होते. त्याने शिंदे, होळकर व भोसले तसेच अन्य लहान-मोठ्या मराठा सरदारांबरोबर वैर निर्माण केले. त्याने इ. स. १८०२ मध्ये इंग्रजांबरोबर वसईचा तह केला व तैनाती फौजेचा स्वीकार केला. आपले स्वातंत्र्य कायमचे घालविले. मराठा सत्तेस येथेच ग्रहण लागले. उरलीसुरली पेशव्यांची सत्ता इंग्रजांनी इ. स. १८१८ मध्ये संपविली. पेशवाई व मराठी राज्याचा अस्त झाला. इंग्रजांना शेवटपर्यंत विरोध करणारी मराठी सत्ता त्यांनी पूर्णपणे संपवली आणि १९ व्या शतकाच्या प्रारंभी सर्व भारतात आपल्या सत्तेचा विस्तार करून इंग्रजी सत्ता स्थिर केली. भारतात प्राचीन काळापासून अनेक परकीय सत्तांची आक्रमणे झाली परंतु या सर्वांपेक्षा इंग्रजांचे आक्रमण गुणात्मकदृष्ट्या वेगळे ठरले. इंग्रजी सत्तेचे केवळ राजकीय परिणाम झाले असे नाही तर त्याचे सामाजिक, आर्थिक व सांस्कृतिक परिणामसुद्धा तितकेच महत्त्वाचे आहेत.

## (अ) १९ व्या शतकाच्या प्रारंभीची राजकीय परिस्थिती

महाराष्ट्राच्या दृष्टीने १९ वे शतक उजाडले ते राजकीय गुलामगिरी घेऊनच. हे शतक महाराष्ट्राच्या जीवनात आमूलाग्र बदल घडवून आणणारे शतक ठरले. येथे केवळ राजकीय सत्तेत बदल झाला असे नाही तर राजकीय सत्तेच्या आनुषंगाने सामाजिक, धार्मिक व आर्थिक जीवनसुद्धा ढवळून निघाले. मराठ्यांच्या स्वतंत्र सत्तेचा झालेला विनाश ही या शतकाच्या प्रारंभीची प्रमुख राजकीय घटना होय. मराठी सत्तेचा शेवट प्रत्यक्ष इ. स. १८१८ मध्ये झाला असला तरी त्याच्या अधोगतीची सुरुवात पेशवाई काळापासूनच सुरू झाली होती. छत्रपती शिवाजी महाराजांनी या टोपीकर इंग्रजांचे वेगळेपण व त्यांचे हेतू ओळखले होते. म्हणून त्यांनी इंग्रजांना खंबीरपणे विरोध करण्याचे धोरण स्वीकारले होते. परिणामी, शिवकाळात मराठ्यांच्या सत्तेत हस्तक्षेप करण्याचे इंग्रजांचे प्रयत्न यशस्वी होऊ शकले नाहीत. तथापि, पेशवेकाळात मराठा सत्तेच्या स्वरूपात व ध्येयधोरणातच बदल झाला त्यामुळे उत्तर पेशवाई काळात इंग्रज यशस्वी झाले.

Scanned with ACE Scanner

छत्रपती शिवाजी महाराजांनी स्वीकारलेले स्वतंत्र हिंदवी स्वराज्याचे ध्येय पेशवे विसरले. महाराजांचा प्रखर विरोध असणारी वतनदारी पद्धत पुन्हा स्वीकारली गेली. छत्रपती शाहूने मुघलांकडून चौथाई, सरदेशमुखीच्या सनदा मिळवून दिल्लीच्या बादशहाचे वर्चस्व स्वीकारले. मराठ्यांची स्वतंत्र व सार्वभौम राष्ट्राची कल्पना मागे पडली. मराठ्यांच्या राज्यकारभारातील छत्रपतीचे महत्त्व कमी होऊन पेशव्यांकडे सर्व सत्तेची सूत्रे गेली. पहिल्या चार पेशव्यांनी काही काळ बलवान केंद्रसत्ता निर्माण करून मराठ्यांच्या सत्तेचा विस्तार करण्याचे प्रयत्न केले. पण याच काळात नानासाहेब पेशव्याच्या मदतीनेच मराठ्यांचे आरमारी वर्चस्व व सामर्थ्य नष्ट करण्यात इंग्रजांना यश मिळाले. इंग्रजांचा हा डाव अदूरदृष्टीच्या, स्वार्थी नानासाहेब पेशव्यांच्या लक्षात आला नाही. इ. स. १७६१ च्या तिसऱ्या पानिपत युद्धानंतर माधवराव पेशव्यांनी मराठ्यांची सत्ता काही काळ सावरून धरण्याचा प्रयत्न केला; पण रघुनाथराव दादाचा घरभेदीपणा, स्वार्थ, सत्तालोलुपता व माधवरावांचा अकाली मृत्यू यामुळे त्यात त्यांना फारसे यश मिळाले नाही. माधवराव पेशव्यांच्या मृत्यूनंतर मराठ्यांच्या सत्तेच्या ऱ्हासाला सुरुवात झाली. प्रमुख राज्यकर्ते व मराठा सरदार यांनी संकुचित दृष्टिकोणाचा स्वीकार करून राष्ट्रहितापेक्षा स्वहित साधण्याकडे विशेष लक्ष दिले. सर्वांनी मिळून मराठेशाहीत भर घालण्याऐवजी, राज्याचे संरक्षण करण्याऐवजी प्रत्येक जण सवता सुभा स्थापन करू लागला. मुलूखगिरीच्या नावाखाली स्वजनांची लूट करण्यास सुरुवात केली. गृहकलहाने मराठ्यांची सत्ता पोखरली गेली. परस्परांत सत्ता स्पर्धा सुरू झाली. परस्परांत संशयाचे वातावरण निर्माण झाले. या शतकाच्या प्रारंभी महाराष्ट्रातील राजकीय परिस्थिती अतिशय गोंधळाची होती. पेशव्याच्या राज्यात शिस्त, कायदा, शांतता व सुव्यवस्था राहिली नाही. इ. स. १७९५ मध्ये सवाई माधवरावांचा मृत्यू झाला. ४ डिसेंबर, १७९६ रोजी अनेक खटपटी व लटपटी करून दुसरा बाजीराव पेशवा झाला. या काळात सर्व मराठा सरदारांना एकत्र करून इंग्रजांना विरोध करण्याचे सामर्थ्य त्याच्यात नव्हते. मराठी सत्तेचा कोसळत चाललेला डोलारा सावरून धरण्याची कुवत त्याच्या अंगी नव्हती. इंग्रजांना विरोध करून मराठा राज्याचे रक्षण करावे असे प्रत्येक सरदाराला वाटत असले तरी त्या सर्वांना एकत्र आणण्याचे प्रयत्न कोणीही केले नाहीत. आपल्या राज्याचे संरक्षण करण्याऐवजी पेशवा दुसरा बाजीराव नाचगाणे, चैन व विलास यातच रममाण झाला. यासाठी लागणारा पैसा मिळविण्यासाठी त्याने आपल्याच सरदारांचा छळ सुरू केला. प्रजेवर अन्यायी व जुलमी कर बसविले. दौलतराव शिंदे व सर्जेराव घाटगे यांनी पुणे लुटले. लोकांचा प्रचंड छळ करून पैसा मिळविला. कोणीही उठावे पाच-पन्नास माणसे बरोबर घेऊन कोणत्याही प्रदेशाची लूट करावी अशा प्रकारचे गोंधळाचे, अराजकतेचे वातावरण या काळात निर्माण झाले. १६ एप्रिल, १८०१ रोजी पेशव्याने विठोजी होळकरास अन्यायाने ठार मारले. त्याचा सूड घेण्यासाठी यशवंतराव होळकराने पुण्यावर हल्ला केला. २५ ऑक्टोबर, १८०२ च्या हडपसर येथील लढाईत यशवंतराव होळकराने दौलतराव शिंदे व पेशव्यांच्या फौजेचा पराभव केला. तेव्हा घाबरलेला दुसरा बाजीराव पेशवा इंग्रजांच्या आश्रयास जाण्याचा विचार करू लागला. त्याने

Scanned with ACE Scanner

इंग्रजांच्या आश्रयास जाऊ नये असे यशवंतराव होळकरासह अनेक सरदारांनी सांगितले पण इंग्रजांशिवाय त्याला दुसरा कोणाचा आधार वाटला नाही. म्हणून त्याने इंग्रजांच्या आश्रयास जाण्याचे ठरविले. वडगाव–सिंहगड–रायगड–बीरवाडी मार्गे वसईस पोहोचला. इंग्रज अधिकारी जॉन माल्कम व कर्नल बॅरी क्लोज हे पेशव्याच्या संपर्कात होते. ३१ डिसेंबर, १८०२ रोजी दुसरा बाजीराव व इंग्रज वकील कर्नल क्लोज यांच्यात वसईचा तह झाला. या तहावर १८ मार्च, १८०३ रोजी गव्हर्नर जनरल लॉर्ड वेलस्ली याने शिक्कामोर्तब केले. वसईच्या तहानुसार दुसऱ्या बाजीरावाने तैनाती फौजेचा स्वीकार केला आणि आपले स्वातंत्र्य इंग्रजांकडे गहाण टाकले. मराठी सत्तेला ग्रहण लागले.

दुसऱ्या बाजीरावाने केलेल्या वसईच्या तहाला शिंदे, भोसले व होळकर या मराठा सरदारांनी विरोध केला. त्यांनी इंग्रजांबरोबर युद्धाची तयारी केली. त्यांनी एकत्रितपणे युद्ध केले असते तर इंग्रजांचा पराभव करणे शक्य होते. पण त्यांचा परस्परांवर विश्वास नव्हता. इंग्रजांनी होळकरांना शिंदे, भोसल्यांपासून अलग केले. यातूनच दुसरे इंग्रज–मराठा युद्ध सुरू झाले. (इ. स. १८०३ ते १८०५) इंग्रजांनी प्रथम शिंदे व भोसले यांच्याशी युद्ध पुकारले व त्यांच्या संयुक्त फौजांचा पराभव केला. नंतर यशवंतराव होळकराचाही पराभव केला. अशा प्रकारे महाराष्ट्रात व भारतात इंग्रजी सत्तेचे वर्चस्व प्रस्थापित झाले. इ. स. १९११ मध्ये इंग्रजांचा रेसिडेंट म्हणून माऊंट स्टुअर्ड एल्फिन्स्टन पुण्यात आला. एल्फिन्स्टनचे पहिले कर्तव्य म्हणजे पेशव्याचे राज्य कमकुवत करणे व वेळ येईल तेव्हा मराठ्यांचे राज्य घशात घालणे हेच होते. त्याने दुसऱ्या बाजीराव पेशव्याच्या अंतर्गत कारभारात हस्तक्षेप करण्यास सुरुवात केली. इंग्रजांबरोबर झालेल्या तहामुळे पेशव्याची मुलूखगिरी बंद झाली होती. पैसा मिळविण्यासाठी पेशव्याने पटवर्धन, रास्ते, पानसे इत्यादी सरदारांचा छळ सुरू केला. त्यांनी एल्फिन्स्टनकडे तक्रारी केल्या. या संधीचा फायदा घेऊन एल्फिन्स्टनने इ. स. १८१२ मध्ये पंढरपूरचा तह करून दक्षिणेच्या जहागीरदारांना पेशव्यांपासून अलग केले. त्यामुळे पेशव्यांचे मराठा सरदारावरील हक्क नष्ट झाले. इ. स. १८१७ मध्ये इंग्रजांनी दुसऱ्या बाजीरावावर जबरदस्तीने पुण्याचा तह लादला. या तहानुसार नर्मदेच्या पलीकडील प्रदेशावरचा पेशव्याचा हक्क संपुष्टात आला. त्याची सत्ता नाममात्र बनली. बाजीराव दुसऱ्याने त्रिंबकजी डेंगळे, बापू गोखले यांसारख्या काही सरदारांच्या मदतीने इंग्रजांबरोबर लढा देण्याचा प्रयत्न केला. इंग्रजांनी पेशव्यांचा सेनापती बापू गोखले याचा पराभव करून पेशव्याच्या सत्तेवर अखेरचा प्रहार केला. २ जून, १८१८ रोजी पेशवा दुसरा बाजीराव इंग्रजांना शरण गेला. इंग्रजांनी मराठ्यांचे राज्य खालसा केले. महाराष्ट्रात घडून आलेल्या सत्तांतरामुळे १९ व्या शतकाचा प्रारंभ मोठा खळबळजनक ठरला. धूर्त एल्फिन्स्टनने सातारा स्टेट निर्माण करून छत्रपतीची सत्ता महाराष्ट्रात काही काळ ठेवली. परंतु इ. स. १८४८ मध्ये दत्तक वारसा नामंजूर करून इंग्रजांनी छत्रपतींची सत्तासुद्धा नष्ट केली.

पेशवाईच्या अखेरच्या कालखंडातील महाराष्ट्रातील राजकीय परिस्थिती सर्वसामान्य लोकांसाठी चांगली नव्हती. महाराष्ट्राच्या राजकीय जीवनात गोंधळ व अव्यवस्था निर्माण

Scanned with ACE Scanner

झाली होती. जातिसंस्थेच्या कडक बंधनांनी व धार्मिक जीवनातील अयोग्य रूढी व परंपरांनी जखडल्या गेलेल्या सामाजिक जीवनाचे प्रतिबिंब राजकीय जीवनात दिसू लागले. प्रशासनातील महत्त्वाची स्थाने, करामधील सवलती, न्यायालयीन सूट इत्यादी बाबी वरिष्ठ मानलेल्या ब्राह्मण जातीलाच मिळू लागल्या. इतर जातींतील पुरुष कितीही कर्तबगार, लायक आणि पराक्रमी असले तरी त्यांना श्रेष्ठ व उच्च पद दिले जात नसे. पेशवाईत ब्राह्मण आपणास राज्यकर्ता वर्ग समजत. साहजिकच राज्यकारभारातील जास्तीतजास्त सवलती व फायदे ते मिळवीत. शेतसाऱ्यात त्यांना भरमसाट सूट मिळे. दुष्काळात हे शासन फक्त ब्राह्मणांना साहाय्य करत असे. कनिष्ठ वर्गांना कोणतेही राजकीय हक्क व सवलती नव्हत्या. ब्राह्मण जातीतील व्यक्तीला विशेष सवलती दिल्या जात. समान गुन्ह्यासाठी निरनिराळ्या जातींच्या लोकांना वेगवेगळ्या शिक्षा होत्या. कायदा व सुव्यवस्थेच्या बाबतीत राज्यकर्ते आपले कर्तव्य पार पाडण्यात अपुरे पडत होते. राज्याच्या प्रशासनात लाचलुचपत व भ्रष्टाचार मोठ्या प्रमाणात माजला होता. प्रजेच्या सुखदुःखाची काळजी घेण्यापेक्षा दुसरा बाजीराव हा नाचगाणे, चैन व विलास यांच्यात जास्त रस घेत होता. या विलासासाठी लागणारा पैसा अनेक प्रकारचे अयोग्य कर लादून प्रजेकडून वसूल केला जाई. पेशव्याचे व सरदारांचे अधिकारी प्रजेची, जहागीरदारांची व सावकारांची लूट करत. शेतकऱ्याला कर वजा जाता राहिलेल्या उत्पन्नात आपला चरितार्थ चालविणे अशक्य बनले होते. शेतमजूर, कामगार व बलुतेदार यांची अवस्था अत्यंत हलाखीची व दयनीय बनली होती.

पेशवा व सरदारांप्रमाणेच सावकार, दरोडेखोर व पेंढारी सामान्य जनतेची लूट करत. गुंडांपासून समाजाचे रक्षण करण्याची जबाबदारी शासन योग्य प्रकारे पार पाडत नव्हते. सतत चालणारी युद्धे, लुटालूट, दंगे–धोपे, हाणामाऱ्या इत्यादींमुळे राजकीय जीवन अशांत होते. उद्योग व व्यापार यांची या काळात अधोगती झाली. दुष्काळात होरपळणाऱ्या जनतेला शासनाचे, राज्यकर्त्यांचे सहकार्य व मदत मिळाली नाही. उलट या अवस्थेतसुद्धा त्यांच्याकडून लूट मिळविली जात असे. अकार्यक्षम, नादान व नीतिहीन सत्ताधीश, भ्रष्ट प्रशासन, स्वार्थांध सरदार व जहागीरदार या सर्वांच्याकडून पिळला जाणारा सामान्य समाज अशी या काळातील राजकीय जीवनाची स्थिती होती. इ. स. १८१८ मध्ये इंग्रजांनी पेशव्यांचे स्वतंत्र राज्य नष्ट केले. याबद्दल सर्वसामान्य माणसाला व समाजाला फारसे दुःख झाले नाही. याउलट अकार्यक्षम व जुलमी राजवट संपली म्हणून आनंदच झाला. बाजीराव दुसरा या पेशव्याचे राज्य गेल्यावर स्त्रियांनी उद्‌गार काढले की, 'बाजीरावाचे आता पुण्यात राज्य नाही. बरे झाले ! चांगले मेल्याचे तळपट झाले. मोठा चांडाळ होता तो'. एल्फिन्स्टनला जे मानपत्र देण्यात आले होते त्यात स्पष्ट लिहिले होते की,'तुम्ही राज्य घेतले ते बरे झाले.' दुसऱ्या बाजीरावाच्या पतनानंतर त्याच्या सैनिकांनी अवघ्या ३६ तासांत इंग्रजांची नोकरी स्वीकारली. महाराष्ट्रात राजकीय स्थित्यंतर होऊन परकीय इंग्रजांची सत्ता प्रस्थापित झाली. इ. स. १९११ पासून महाराष्ट्रात रेसिडेंट म्हणून आलेल्या एल्फिन्स्टनने येथील समाजात इंग्रजांविषयी विश्वास निर्माण करण्यास सुरुवात केली होतीच. त्याने सर्वांत प्रथम शांतता व सुव्यवस्था

Scanned with ACE Scanner

प्रस्थापित करण्यास अग्रक्रम दिला. कायद्याचे राज्य निर्माण करण्याचा प्रयत्न सुरू ठेवला. महाराष्ट्रातील गुंड, पुंड, दरोडेखोर व पेंढारी यांचा बंदोबस्त केला. अराजकता संपविली. त्याने न्यायव्यवस्थेतील उणिवा व दोष नष्ट करण्याचा प्रयत्न केला. न्यायाच्या क्षेत्रात समानता प्रस्थापित केली. पेशवाईतील न्यायव्यवस्थेत असलेली विषमता नष्ट केली. परिणामी, सामान्य जनतेत इंग्रजांविषयी आपुलकी निर्माण झाली. इंग्रज शासनावर त्याचा विश्वास वृद्धिंगत होत गेला. शेतकऱ्यांना शेतात वर्षभर केलेल्या कष्टाचे फळ मिळू लागले. कार्यक्षम प्रशासनाचा अनुभव लोकांना आला. आकस्मित वाढविले जाणारे कर व महसूल बंद केला. लोकांच्या आर्थिक जीवनात सूत्रबद्धता व स्थैर्य निर्माण झाले. ब्रिटिश राज्यकर्ते व त्यांचे प्रशासकीय अधिकारी यांच्याविषयी समाजात आदरयुक्त भीतीची भावना निर्माण झाली. इंग्रजी सत्ता म्हणजे ईश्वरी संकेत आहे असे लोक मानू लागले. वरील बाबींमुळे येथील समाजाने इंग्रजी सत्तेला आवश्यक ते सहकार्य केले. इंग्रजी राजवटीने हे जे परिवर्तन घडवून आणले त्या संदर्भात लोकहितवादी म्हणतात,' इंग्रजी अमलाच्या आधी प्रजेची दुर्दशा, मराठेशाहीत दाद नाही व मक्तेदारीचा जुलूम. तसेच लष्करे, शिपाई जिकडे तिकडे फिरत, त्यातून पेंढाऱ्यांचा उपद्रव, लोक अगदी त्रासून गेले. त्यामुळे इंग्रज चांगला व इन्साफी असे लोकांस वाटू लागले व त्यांचे राज्यनिर्मितीस साहाय्य मिळाले.' एल्फिन्स्टनने शांतता व सुव्यवस्था निर्माण करून सर्वसामान्य जनतेचा पाठिंबा मिळविला. ब्राह्मण वर्गासाठी परंपरागत चालत आलेली दक्षिणा व महावस्त्राची पद्धत चालू ठेवून त्याचे सहकार्य मिळविले. विश्वास संपादन केला. भौतिक प्रगती, वैज्ञानिक दृष्टी व प्रगत विचारसरणीच्या अभावामुळे व त्याविषयीच्या अज्ञानामुळे आपण इंग्रजांच्या गुलामगिरीत अडकलो. पारतंत्र्यात गेलो याची जाणीव येथील समाजातील कोणत्याही वर्गाला झाली नाही. १९ व्या शतकाच्या प्रारंभीच्या काळात पेशव्यांच्या राजवटीत असलेले महाराष्ट्रातील राजकीय जीवनाचे चित्र इंग्रजांनी १८१८ नंतर बदलण्यास सुरुवात केली. इ. स. १८१९ मध्ये कर्तबगार, मुत्सद्दी, अभ्यासू व दूरदृष्टीचा एल्फिन्स्टन मुंबई प्रांताचा गव्हर्नर झाला. आपल्या कारकिर्दीत त्याने कायद्याचे राज्य प्रस्थापित केले. सुनियंत्रित, शिस्तबद्ध व कार्यक्षम असे इंग्रजांचे प्रशासन निर्माण केले.

### (ब) १९ व्या शतकाच्या प्रारंभीची सामाजिक परिस्थिती

१९ व्या शतकातील महाराष्ट्रातील समाजसुधारणांच्या चळवळीचा इतिहास पाहण्यापूर्वी १९ व्या शतकाच्या प्रारंभी येथील समाजजीवनाचे स्वरूप काय होते हे पाहणे आवश्यक ठरते. ते अभ्यासल्याशिवाय समाजसुधारणेच्या चळवळीच्या इतिहासाचे आकलन होत नाही. या काळात महाराष्ट्रातील समाजात वर्णव्यवस्था, जातिव्यवस्थेतील कडक निर्बंधांना विशेष महत्त्व प्राप्त झाले होते. वैज्ञानिक दृष्टिकोण व बुद्धिप्रामाण्यवाद यापेक्षा समाजजीवनातील चालीरीती, रूढी, परंपरा व ग्रंथप्रामाण्याला विशेष महत्त्व होते. धार्मिक आचार व विचारांचा प्रभाव समाजजीवनावर पडला होता. भारतीय समाजाचे ठळक वैशिष्ट्य म्हणजे 'एका गावात दोन गावे ' हे होय. महाराष्ट्र त्याला अपवाद नव्हता. एक वेशीच्या आतील गाव आणि दुसरे वेशीबाहेरील गाव. भारतातील व महाराष्ट्रातील ग्रामीण समाजजीवनाचे आकलन केवळ या

Scanned with ACE Scanner

एका वैशिष्ट्यावरूनसुद्धा होऊ शकते. हिंदू धर्म व धर्ममार्तंडांनी बनविलेल्या या वर्ण व जाति-व्यवस्थेमुळे येथे गावेच दुभंगलेली आहेत असे नाही तर माणसांची मनेसुद्धा दुभंगलेली आहेत. अस्पृश्यांचे पाणवठे वेगळे, मसनवटे वेगळे आहेत. अशा प्रकारे येथील समाज जाती-धर्म व्यवस्थेने बंदिस्त केला होता. अस्पृश्यांना त्यांनी हिंदू मानले पण बांधव कधीच मानले नाही. सामाजिक विषमता हे या काळातील हिंदू समाजरचनेचे खास वैशिष्ट्य बनले होते.

**१. धार्मिक जीवन :** या काळातील समाजजीवनावर धार्मिक आचार व विचारांचा मोठा प्रभाव होता. परंतु पेशवेकाळात धर्माची मूलभूत तत्त्वे बाजूला पडली होती. धार्मिक आचार, परंपरा, कर्मकांड व व्रतवैकल्ये यांना महत्त्व प्राप्त झाले होते. हिंदू धर्माचे शुद्ध स्वरूप नष्ट झाले होते. ब्राह्मण भोजने, दानधर्म, कर्मकांड यांचे महत्त्व वाढले होते. समाजात ऐतखाऊ व आळशी पुरोहितांचा वर्ग निर्माण झाला होता. उत्तर पेशवाई कालखंडात तर याचा कळस झाला. ज्योतिष, मुहूर्त, शुभाशुभ व्रते, नाम, जप, दान इत्यादींचे स्तोम माजले. व्रतवैकल्ये, नामजप, अनुष्ठाने केल्याने पापक्षालन होते. देवदेवतांची कृपा होते असा विचार रूढ झाला. धर्मगुरु, शास्त्री, पंडित या उच्च वर्णीयांनासुद्धा खऱ्या धर्माचा व धर्मतत्त्वांचा विसर पडला होता. धर्माच्या नावाखाली सर्वत्र अधर्म माजला होता. तंत्र-मंत्र, जादूटोणा, भूतपिशाच्च विद्या यांना या काळात विशेष महत्त्व प्राप्त झाले होते. तंत्र-मंत्राने संकटे दूर होतात असे मानले जात होते. दानधर्माने पुण्य प्राप्त होते ही समाजाची धारणा होती. खुद्द पेशवे अनेक प्रसंगी मोठ्या प्रमाणात दानधर्म करीत असत. या काळातील लोकांचा अनुष्ठानावर दृढ विश्वास होता. त्यामुळे लोक अनेक प्रकारची अनुष्ठाने करत. अनुष्ठानावर भरमसाट खर्च केला जात असे. समाजातील अंधश्रद्धा, कर्मकांडे, व्रतवैकल्ये यांचा पुरोहितांनी आपल्या फायद्यासाठी उपयोग करून घेतला. पेशवाईत मोठ्या प्रमाणात ब्राह्मणांना दानधर्म करणे, त्यांना सहस्र भोजने घालणे यामुळे पुण्य लाभते अशी समाजाची श्रद्धा होती. दानधर्म, भोजने यांचा ब्राह्मणांवर अक्षरशः वर्षाव होत असे. दुसऱ्या बाजीराव पेशव्याच्या काळात तर ब्राह्मण भोजने व ब्राह्मणांना दक्षिणा यावर लाखो रुपयांची उधळपट्टी करण्यात आली होती. शिव, विष्णू, विठोबा, खंडोबा, भैरव, भवानी या देवतांबरोबरच मरीआई, म्हसोबा, वेताळ इत्यादी ग्रामदैवतांना महत्त्व प्राप्त झाले होते. प्रसिद्ध समाजसुधारक लोकहितवादी यांनी १९ व्या शतकाच्या प्रारंभी दिसणाऱ्या समाजाच्या धार्मिक स्थितीविषयी म्हटले आहे, "हिंदू लोकांत सांप्रत अनाचार फार माजला आहे. निरर्थक कामे आणि ढोंग फार होऊन त्यातील बीजरूपी जी नीती तीच भ्रष्ट झाली आहे. आता जो धर्म चालला आहे तो धर्म नव्हे. हा बेबंद गोंधळ आहे. लोकनीती नाहीशी झाली व धर्म बुडाला असे म्हणतात पण मला तर धर्म कोठेच दिसत नाही." थोडक्यात, १९ व्या शतकाच्या प्रारंभी धार्मिक जीवनाचे स्वरूप पाहिल्यास या काळात वेदपरंपरा नष्ट झाली होती. बुद्धिप्रामाण्यापेक्षा अंधश्रद्धा, रूढी व परंपरा यांनाच जास्त महत्त्व आल्याने खरा धर्म मागे पडला होता. या काळात हिंदू धर्मात अनेक पंथ-उपपंथांचा उदय झाला होता. प्रत्येक जण स्वतःच्या श्रद्धेनुसार वेगवेगळ्या पंथांचा उपासक होता. पंथ श्रेष्ठत्वाची भावना प्रबळ होती. उत्तर पेशवाईत शाक्तपंथासारख्या काही अघोरी पंथांनासुद्धा

Scanned with ACE Scanner

समाजात प्रतिष्ठा प्राप्त झाली होती. अशा प्रकारे अनेक अनिष्ट रूढी, परंपरा, अंधश्रद्धा, अयोग्य आचार व विचार यांनी महाराष्ट्रातील धार्मिक जीवन झाकोळलेले होते.

**२. अंधश्रद्धा व व्रतवैकल्ये :** पेशवेकाळात व्रतवैकल्यांना, भोळसट समजुती व अंधश्रद्धेस ऊत आला होता. दाने, व्रते, अनुष्ठाने, उपवास केल्याने परमेश्वराची व ग्रहांची कृपा होते ही समजूत दृढ झाली होती. मंत्रतंत्राने संकटे दूर होतात. अरिष्ट टळते अशी समजूत होती. व्रतांची नावे, ती करण्याची पद्धत व त्यांची फळे यासंबंधीचे व्यापक उल्लेख मराठी कागदपत्रात मिळतात. पायगुण, शकुन, अपशकुन यांवर लोकांचा विश्वास होता. या काळातील समाज ग्रहणाला मोठे अरिष्ट मानत होता. ग्रहणामुळे आपल्यावर ग्रहांचा कोप होऊ नये म्हणून ग्रहण काळात लोक कुवतीप्रमाणे स्नान, दान व जप करत असत. मंत्रतंत्र, भूतबाधा, चेटूक, जारण-मारण-तारण, जादूटोणा यांवर अज्ञानी लोकांचा विश्वास होता. भूताटकी, चेटूक, देव-देवऋषी हे तर त्या काळातील समाजाच्या पाचवीलाच पुजले होते. या संदर्भात वा. कृ. भावे म्हणतात, 'कोकणची भुते देशावरच्या भुतांपेक्षा जास्ती खट्याळ होती.' अशा प्रकारच्या अंधश्रद्धा त्या काळात दिसतात.

**३. जातिव्यवस्था :** १९ व्या शतकाच्या प्रारंभी जातिव्यवस्थेचा, जातिसंस्थेचा समाजात मोठा प्रभाव होता. जातिव्यवस्था ही या समाजातील भयंकर पद्धती आहे. माणसाच्या जीवनावर सर्व प्रकारचा प्रभाव पाडून त्याचे नियंत्रण ही करते. भारतात या जातिव्यवस्थेत हजारो जाती आहेत. त्याशिवाय शूद्र-अतिशूद्र, अस्पृश्य, आदिवासी, भटके-विमुक्त समाज अशा सामाजिक व आर्थिकदृष्ट्या अधोगतीला गेलेले समाज या जातिव्यवस्थेच्या पोटी जन्माला आले आहेत. या जातिव्यवस्थेला धर्मशास्त्रांचा, स्मृती व पुराणांचा आधार होता. त्यामुळेच जातिव्यवस्थेने माणसाच्या सामाजिक, आर्थिक, धार्मिक, राजकीय व सांस्कृतिक जीवनावर पोलादी पकड ठेवून कडक नियंत्रण ठेवले होते. जातिव्यवस्थेमुळे मनुष्य ज्या जातीत जन्माला आला ती त्याची जात ठरते. जातीबरोबरच त्याचा धंदा ठरतो. मनुष्याची किंमत गुणावरून न ठरता ती त्याच्या जन्म घेतलेल्या जातीवर ठरते. एका जातीच्या माणसाला त्याच्या जातीची कोंडी फोडून दुसऱ्या जातीत जाता येत नसे. तसेच त्याला त्याच्या जातीचा धंदा सोडून दुसऱ्या जातीचा धंदाही करता येत नसे. तो ज्या जातीत जन्माला येतो, त्याच जातीत आयुष्यभर जगून त्या जातीतच मरतो. जातिसंस्थेने वैशिष्ट्यपूर्ण अशी एक उतरंडच तयार केली होती. समाजात प्रत्येक जातीला सामाजिक स्थान होते. या स्थानानुसारच प्रत्येक जातीला सामाजिक हक्क, अधिकार व कर्तव्ये लाभली होती. उच्च व वरील जातींना अनेक प्रकारचे विशेषाधिकार मिळाले होते तर कनिष्ठ, नीच जातीच्या लोकांना मूलभूत मानवी हक्कांपासून वंचित ठेवले होते. त्यांच्यावर कडक व जाचक बंधने लादली होती. या बंधनांचे उल्लंघन केल्यास सामाजिक बहिष्कार, जातिबहिष्कृत करण्यात येत असे. मानवाचे जीवनच उद्ध्वस्त करणारी बहिष्काराची ही शिक्षा तुरुंगवास किंवा फाशीपेक्षा हानिकारक होती. रोटीबेटी व्यवहार, विवाह जातीच्या बाहेर जाऊन करता येत नसत. जातिबाह्य विवाह हा गंभीर स्वरूपाचा सामाजिक गुन्हा मानला जात असे.

ब्राह्मण स्वतःला सर्व जातींच्या लोकांपेक्षा श्रेष्ठ, उच्च समजत. इतर सर्व जातींतील लोकांना तुच्छ, कनिष्ठ लेखत. ब्राह्मणांची सेवा करणे हा शूद्रांचा धर्म व कर्तव्यच आहे असे प्रतिपादन केले जात असे. तसेच धर्माच्या नावावर कनिष्ठ, शूद्र व अतिशूद्र जातीच्या लोकांच्या शोषणांची एक कायमस्वरूपी टिकून राहणारी सामाजिक व्यवस्थाच निर्माण करून ठेवली होती. या काळात सर्वच जातींत संघर्ष सुरू होता. ब्राह्मण-ब्राह्मण संघर्ष, ब्राह्मण- मराठा संघर्ष, कनिष्ठ जातीतसुद्धा श्रेष्ठत्वासाठी तंटे व संघर्ष होत असत. या संदर्भात वा. कृ. भावे म्हणतात, 'भिक्षुक वर्गामध्ये ऋग्वेदी, यजुर्वेदी, सामवेदी, तैतरिय, वाजसेत्रिय अशा प्रकारचे पोटभेद असून त्यांच्यात मोठेपणाविषयी अहमहमिका लागून तट पडत असत. मारामाऱ्या होत व ग्रामणे माजत.' अशा प्रकारची जातिव्यवस्था महाराष्ट्रात १९ व्या शतकाच्या प्रारंभी असल्याचे दिसते.

**४. अस्पृश्यता :** हिंदू धर्मातील वर्णव्यवस्थेची परिणती जातिव्यवस्थेत झाली आहे. हिंदू जातिव्यवस्थेच्या या विषवृक्षाला 'अस्पृश्यता' हे लागलेले महाविषारी फळ होय. हिंदू समाजरचनेने व या देशातील ग्रामीण जीवनात असणाऱ्या 'बलुतेदारी' पद्धतीने जातीयतेचे व अस्पृश्यतेचे पोषण करून त्यांना वृद्धिंगत करण्याचे, स्थिर करण्याचे काम केले आहे. १९ व्या शतकात धर्मशास्त्रांचा, स्मृतिकारांचा, पुराणांचा प्रभाव हिंदू समाज व्यवहारावर, समाजरचनेवर होता. त्यांनी हिंदू समाज व समाजाचे व्यवहार जखडून, बांधून टाकले होते. या धर्मग्रंथांनीच शूद्र, अतिशूद्र, चांडाळ, दास अशा कनिष्ठ व सामाजिकदृष्ट्या हीन दर्जाच्या जातींना जन्म दिलेला आहे. ते या समाजाच्या खालच्या पायरीचे म्हणून अस्पृश्य मानले. 'अस्पृश्य' म्हणून त्यांना गावकुसाबाहेर कायमचे वस्ती करून ठेवले. त्यांना घाणेरडी कामे दिली. ही कामे करण्यात त्यांनी काही कसूर केली तर त्याला कडक, कठोर शिक्षेची तरतूदसुद्धा करून ठेवली. उत्तर पेशवेकाळात महार, मांग, ढोर व चांभार यांना अस्पृश्य म्हणून वागविले जात होते. या जातीतील लोकांचे जगणे अमानुष व मानवतेला कलंक फासणारे होते. सर्वच जातींतील लोकांना अस्पृश्यांच्या स्पर्शाने विटाळ होत असे. त्यांची शुद्धी जात असे. अशा अस्पृश्य जातीतील लोकांना पेशवाई काळात पुण्यात फिरताना त्यांच्यावर अनेक बंधने होती. पुण्यात अस्पृश्यांना फक्त दुपारी गळ्यात मडके व कमरेस झाडांची फांदी बांधून फिरावे लागत असे. दुपारी त्याची सावली छोटी होई व त्याच्याच पायात पडे. गळ्यातील मडके त्याच्या थुंकीचा विटाळ टाळी व झाडाची फांदी त्याची मातीत उमटलेली पावले पुसून टाकी. त्यांचे पानवठे व मसनवटे वेगळे होते. त्यांना मंदिरात प्रवेश नव्हता. अशा प्रकारे १९ व्या शतकाच्या प्रारंभी अस्पृश्यांची स्थिती दयनीय, दुर्दैवी, अत्यंत वाईट व हलाखीची होती.

**५. वेठबिगार :** उत्तर पेशवाईत वेठबिगार पद्धत अस्तित्वात होती. अतिशूद्र जातीतील लोकांना वेठबिगार म्हणून वापरले जाई. वेठबिगारांना सरकारी बांधकाम, रस्ते दुरुस्ती करणे, सरकारी गवत, कुरणे कापणे, इनामदार, जहागीरदार, देशमुख इत्यादी महत्त्वाच्या वतनदारांच्या घरी वेठबिगार असत. त्यांच्याकडून सर्व प्रकारची कामे करून घेतली जात. छत्रपती, पेशवे, सरदार जेव्हा प्रवास, शिकार व तीर्थक्षेत्रास जात तेव्हा त्यांच्या प्रवासाची, राहण्याची, साहित्याची, जेवणखाण व पाण्याची सोय करण्यासाठी कुंभार, सुतार, गुरव व लोहार इ. जातींतील लोकांना वेठबिगार म्हणून राबावे लागत असे.

Scanned with ACE Scanner

**६. दास–दासी :** पेशवाई काळात महाराष्ट्रात दास–दासींची पद्धत अस्तित्वात होती. दास–दासींना साधारणतः गुलामाप्रमाणे वागविले जात असे. दासांना 'पोरगे' म्हणत तर दासींना 'कुणबीण' म्हणत. घरगुती कामासाठी दास व दासी ठेवत असत. सरदार, जहागीरदार, राजे व त्यांचा दरबारी यांच्या पदरी हे दास व दासी असत. पेशवेकाळात दासाची (पोरग्याची) किंमत १२५–१५० होती, तर दासीची (कुणबिणीची) किंमत ६०–७० रु. होती. दास–दासींना मोबदला देऊन, पर्यायी व्यक्ती देऊन मुक्तता करून घेता येत असे. दास–दासी म्हातारे झाल्यानंतर मालक त्यांची दास्यातून मुक्तता करीत असत.

**७. स्त्रीजीवन :** १९ व्या शतकाच्या प्रारंभीच्या काळात महाराष्ट्रातील समाजव्यवस्था ही पुरुषप्रधान होती. मालमत्तेचा अधिकार फक्त पुरुषालाच होता. कुटुंबात पुरुषाचीच सत्ता चालत असे. मात्र या काळात स्त्रियांची स्थिती अत्यंत वाईट व करुणाजनक होती. स्त्री–जीवन हे धर्मशास्त्रे, रूढी, परंपरा, चालीरीती यांच्या बंधनात सर्व बाजूंनी जखडले गेले होते. बंदिस्त झाले होते. चूल व मूल हीच तिची मूलभूत कर्तव्ये ठरविली होती. भोगवस्तू म्हणून तिच्याकडे पाहिले जात होते. तिला आचार व विचारांचे स्वातंत्र्य नव्हते. शिक्षणाचा अधिकार नव्हता. धर्मग्रंथ व शास्त्रे वाचण्याचा अधिकार नव्हता. तिला वेदोक्त पद्धतीने कोणताही संस्कार करून घेण्यास मुभा नव्हती. संस्कारविधीत तिला शूद्रासारखे वागविले जात होते. स्त्रियांविषयीच्या या काळातील वाईट चालीरीती, रूढी, परंपरा यांचा थोडक्यात आढावा पुढीलप्रमाणे–

***(अ) सती पद्धती :*** सती पद्धती म्हणजे स्त्रीजीवनाला मोठा शाप होता. पेशवेकाळात या पद्धतीला प्रतिष्ठा प्राप्त झाली होती. सती जाणाऱ्या विधवा स्त्रियांची स्थिती करुण व केविलवाणी होत असे. सतीची चाल म्हणजे माणुसकीला काळिमा फासणारी पद्धत होती. पेशवेकाळात सतीच्या प्रथेस प्रोत्साहन मिळाले. १०–१२ वर्षांच्या मुलीलासुद्धा सती जावे लागे. काही वेळा सती जाण्यासाठी जबरदस्ती केली जात असे. देशस्थापेक्षा कोकणस्थ ब्राह्मण सतीच्या चालीला बराच काळ चिकटून राहिले.

***(ब) बालविवाह :*** पेशवाईत सर्रास बालविवाह होत असत. मुलगी ८ ते ९ वर्षांच्या पुढे लग्नाशिवाय राहिल्यास पेशवाईत अधर्म मानला जात असे. मुलाचे लग्नाचे वय १२–१३ वर्षांचे असे. पण पुरुष युद्धात, साथीच्या रोगात अथवा कोणत्याही कारणाने मृत्यू पावल्यास त्या मुलीस सर्व आयुष्य विधवा अवस्थेतच घालवावे लागे.

***(क) विधवा विवाहास बंदी :*** ब्राह्मण समाज व ९६ कुळी क्षत्रिय मराठा यांच्यात विधवांच्या विवाहास बंदी होती. शूद्र व अतिशूद्र समाजात विधवांच्या विवाहाला परवानगी होती.

***(ड) केशवपन :*** ब्राह्मण समाजात विधवा स्त्रीचे केशवपन व मुंडन करण्याची प्रथा सुरू होती. केशवपन केल्याने ती विद्रूप दिसावी हा हेतू होता. या विधवेस परावलंबी व अपमानीत जीणे आयुष्यभर जगावे लागत असे.

Scanned with ACE Scanner

**(इ) बहुपत्नीकत्व :** १९ व्या शतकाच्या प्रारंभी बहुपत्नीकत्वाची चाल मोठ्या प्रमाणात अस्तित्वात होती. सरदार, जहागीरदार, वतनदारांच्यात ही प्रथा सर्रास सुरू होती. त्यामुळे पुरुष कोणत्याही वयात कितीही लग्ने करीत असत. विवाहबाह्य संबंध ठेवण्यास पुरुषांना परवानगी होती. अंगवस्त्र ठेवण्यासही मान्यता होती.

याशिवाय या काळात स्त्रीजीवनाशी निगडित देवदासींची पद्धत रूढ होती. तसेच बाला-जरठ विवाहसुद्धा काही प्रमाणात होत असल्याची अनेक उदाहरणे उत्तर पेशवाईत मिळतात. याशिवाय नरबळी, बालिका हत्या इत्यादींसारख्या अनेक अनिष्ट प्रथा रूढ होत्या. महाराष्ट्रात इंग्रजांची राजवट सुरू झाली तेव्हा येथील समाज व आधुनिक वैज्ञानिक व बुद्धिप्रामाण्यवादी विचारांपासून शेकडो योजने दूर होता. मूलभूत स्वातंत्र्य, सामाजिक समता, बंधुभाव, पुरोगामी विचार या बाबी स्वीकारण्यास या समाजाची तयारी नव्हती. म्हणूनच १९ व्या शतकातील हा समाज गतिहीन होऊन बसला होता.

Scanned with ACE Scanner

परिस्थिती होती.

### (ड) १९ व्या शतकाच्या प्रारंभीची आर्थिक परिस्थिती

शिवकाळात छत्रपती शिवाजी महाराजांनी अत्यंत प्रतिकूल परिस्थितीत स्वराज्याची निर्मिती केली. आपले छोटेसे स्वराज्य त्यांनी पराक्रमाची, उत्तम मुलकी प्रशासनाची व

Scanned with ACE Scanner

काटकसरीची पराकाष्ठा करून भक्कम आर्थिक पायावर उभे केले. पेशवाईत पेशव्यांनी त्या स्वराज्याचे साम्राज्यात रूपांतर केले. पण या मराठी साम्राज्याला भक्कम व स्थिर आर्थिक पायावर उभारण्याची काळजी त्यांनी घेतली नाही. पेशव्यांच्या समोर नेहमीच आर्थिक समस्या उभ्या राहिल्या. आर्थिक संकटे आली त्यांचा परिणाम राज्यवृद्धी व राजकारणावर झाला. उत्तर पेशवाईत मराठ्यांचा संघर्ष आर्थिकदृष्ट्या संपन्न असणाऱ्या ब्रिटिश राजवटीबरोबर सुरू झाला. या संघर्षात मराठे पराभूत झाले. या देशात इंग्रजांची राजवट सुरू झाली. इंग्रजांनी आपल्या राजवटीत नेहमीच आर्थिक गोष्टींना सर्वांत महत्त्वाचे स्थान दिले आणि म्हणूनच भारतात त्यांचे राज्य वाढले व दीर्घकाळ टिकून राहिले. १९ व्या शतकाच्या प्रारंभीच्या महाराष्ट्राच्या आर्थिक परिस्थितीचा विचार करत असताना आपणास उत्तर पेशवाईतील आर्थिक परिस्थितीचा आढावा घेणे क्रमप्राप्त ठरते. या काळात महाराष्ट्राची अर्थव्यवस्था ही कृषिप्रधान होती. शेती हाच येथील समाजाचा सर्वांत मोठा महत्त्वाचा व्यवसाय होता. भारत हा खेड्यांचा देश आहे. बहुसंख्य समाज ग्रामीण भागात खेडेगावात राहत होता. त्या काळात प्रत्येक खेडे हे स्वयंपूर्ण होते. खेड हे स्वयंपूर्ण असा आर्थिक व प्रशासकीय घटक होता. गावांचा कारभार हा गावातील लोकांकडूनच चालविला जात होता.

**१. स्वयंपूर्ण ग्रामव्यवस्था व बलुतेदारी :** भारतातील ग्रामव्यवस्था ही प्राचीन काळापासून इंग्रजी राजवटीपर्यंत वर्षानुवर्षे अबाधित राहिल्याचे दिसते. अनेक राजवटी येथे आल्या व गेल्या पण येथील ग्रामव्यवस्था व ग्रामसंस्था (गावगाडा) यावर त्यांचा काहीही परिणाम झाला नाही. प्राचीन काळापासून अर्वाचीन काळापर्यंत राज्यकर्त्यांनीसुद्धा त्यात लक्ष घातले नाही. गावगाड्यात हस्तक्षेप करण्याचा प्रयत्न केला नाही. त्यामुळेच १९ व्या शतकाच्या प्रारंभीसुद्धा त्यात फारसा फरक पडल्याचे दिसत नाही. या काळात महाराष्ट्रात स्वयंपूर्ण ग्रामव्यवस्था होती. पाटील व कुलकर्णी हे गावचे प्रमुख होते. त्यांच्यावरच गावाचे संरक्षण करणे, शेतसारा वसूल करणे व गावचे न्यायदान करणे इत्यादी महत्त्वाच्या कामांची जबाबदारी होती. राज्याच्या उत्पन्नाचे प्रमुख साधन म्हणजे शेतसारा. शेती हाच गावचा प्रमुख व्यवसाय. शेती व्यवसाय व शेतकऱ्यांना मदत करणारा बलुतेदारांचा वर्ग त्याच गावात राहत असे. कुंभार, सुतार, लोहार, न्हावी, परीट, गुरव, महार, मांग, चांभार, तराळ, जोशी व मुलाणी इत्यादी बलुतेदार किंवा त्यांना 'कारू' म्हणत. याशिवाय आलुतेदारांचाही वर्ग असे. त्यात तेली, तांबोळी, साळी, माळी, शिंपी, वाणी, गोंधळी, सनगर, सोनार, ठाकर जंगम, घडशी इ. आलुतेदारांचाही समावेश असे त्यांना 'नारू' म्हणत. गावातील शेतकऱ्यांच्या व गावकऱ्यांच्या सर्व प्रकारच्या गरजा भागविण्याचे, पूर्ण करण्याचे काम ते करत असत. त्या मोबदल्यात शेतकऱ्यांकडून त्यांना बलुते व आलुते मिळत असे. या बलुत्यावरच त्यांचा उदरनिर्वाह चाले. पण १९ व्या शतकाच्या प्रारंभी हे बलुते पुरेसे मिळत नसे. कारण शेतकऱ्याची आर्थिक स्थिती वाईट होती.

**२. शेती व शेतकऱ्यांची स्थिती :** शेती व शेतकरी हाच गावच्या अर्थव्यवस्थेचा कणा होता. कारण स्वयंपूर्ण ग्रामीण अर्थव्यवस्था शेती व्यवसायाभोवतीच केंद्रित झालेली होती.

Scanned with ACE Scanner

उत्तर पेशवाईत महसूल वसुलीसाठी खेड्यांचे विभाजन झालेले दिसते. इनाम खेडी, मोकासा खेडी, महसूल खेडी इत्यादी पेशवाईत हा महसूल अनेक निकष लावून ठरविलेला असे. उदा. जमिनीची प्रत, पिकाचा प्रकार, खरीप-रब्बी पीक, बागायती, जिरायती पिके इत्यादी. साधारणतः एकूण उत्पन्नाच्या १/३ महसूल सरकारकडून आकारला जात असे. हा महसूल रोख किंवा वस्तूच्या स्वरूपात स्वीकारत. गावात शेतकऱ्यांत वतनदार, मिरासदार, उपरी असे काही वर्ग होते. शेतकरीच सर्वांचा पोषणकर्ता होता पण त्याचीच स्थिती अत्यंत वाईट होती, कारण महाराष्ट्रातील नैसर्गिक परिस्थिती, येथील लहरी पाऊस, कधी अतिवृष्टी तर कधी दुष्काळ, रोगराई, टोळधाड, लष्कराने पिकाचे केलेले नुकसान इत्यादींमुळे शेत पिकाचे व शेतकऱ्याचे प्रचंड नुकसान होई. त्यातून आलेल्या पीक उत्पन्नातून बलुते द्यावे लागे, महसूल द्यावा लागे. शासकीय विविध कर द्यावे लागत. शेवटी त्याच्याकडे जे राहील ते नेण्यासाठी सुगीच्या काळात सावकारच खळ्यावर येत असे. त्याचे देणे द्यावे लागे. लग्न, दुष्काळ, अडीअडचणीसाठी त्याच्याकडून कर्ज घेतलेले असे. सावकारांचा व्याजाचा दर प्रचंड होता. कर्ज फिटले नाही तर सावकार जमिनी ताब्यात घेत. कर्ज व करवसुलीसाठी शेतकऱ्यांचा अमानुष पद्धतीने, क्रूर पद्धतीने छळ केला जात असे. त्यामुळे या काळात शेतकरी, शेतमजूर यांची अवस्था दयनीय होती. त्यातच शेतमालाची चोरी, लुटालूट, जाळपोळ इत्यादींमुळे शेतकऱ्याचे नुकसान होई. महाराष्ट्रातील सर्व शेती जिरायती होती. पेशव्यांनी शेती विकासासाठी खास प्रयत्न केल्याचे फारसे दिसत नाही. कायमस्वरूपी आर्थिक स्थैर्य निर्माण करण्याचे प्रयत्न या काळातील राज्यकर्त्यांकडून झालेले दिसत नाहीत. अशा प्रकारे घरातील सर्व लोकांच्यासह शेतावर रात्रंदिवस राबूनसुद्धा शेतकऱ्याला सुखाने जगता येत नव्हते. दारिद्र्य तर त्याच्या पाचवीलाच पुजलेले होते. उत्तर पेशवाईत तर या बाबींचा कळस झाला. चैन, विलास, दानधर्म, भोजनावळीसाठी शासनकर्त्यांनी रयतेकडून जास्त पैसा वसूल केला. शेतकरी व रयत यांना कोणी वाली उरला नाही. शेतसारा व करवसुलीसाठी शेतकऱ्यास फार छळत. मिरचीची धुरी देत, ओणवे करून पाठीवर मोठे दगड ठेवत. तापल्या तव्यावर उभे करत. क्रौर्याची परिसीमा गाठली जाई. वरील सर्व परिस्थितींचा आढावा घेतल्यानंतर शेती, शेतकरी व शेतमजूर यांची परिस्थिती कशी होती याचे चित्र आपल्यासमोर उभे राहते.

**३. मराठाकालीन व्यापार-उद्योग व व्यवसाय :** महाराष्ट्रात शिवकाळात छत्रपती शिवाजी महाराजांनी येथील व्यापार, उद्योग व व्यवसाय याकडे जाणीवपूर्वक लक्ष दिले होते. त्याच्या वाढीसाठी प्रयत्न केले होते. सुरुवातीच्या पेशव्यांनी साम्राज्यविस्ताराबरोबर व्यापार, उद्योग व व्यवसायाकडे काही प्रमाणात लक्ष पुरविले. परंतु उत्तर पेशवाईच्या काळात विविध कारणांमुळे व्यापार, उद्योग व व्यवसाय याकडे राज्यकर्त्यांचे दुर्लक्ष झाले. त्यांनी या गोष्टींकडे लक्ष दिले नाही. परिणामी व्यापार बसला, उद्योग बुडाले, व्यवसाय संपला. वरील लोकांचा बोजा पुन्हा शेती व शेतीवर अवलंबून असणाऱ्या गोष्टींवरच पडला. शेतकरी, राज्य व समाज यांची आर्थिक अवस्था अत्यंत बिकट झाली.

**(अ) मराठाकालीन बाजारपेठा :** शेतीमालाचे उत्पादन व त्याचे वितरण हा ग्रामीण अर्थव्यवस्थेचा मुख्य गाभा होता. मराठा काळात बाजार व्यवस्थापन करणारी व बाजारपेठांवर नियंत्रण करणारी एक व्यवस्था होती. त्यात शेटे, महाजन, आवटे, कमावीसदार, कोतवाल इत्यादी अधिकारी होते. कसबा, बाजारपेठा व आठवडे बाजार यांच्यावर त्यांचे नियंत्रण असे. मालाची कृत्रिम टंचाई, कृत्रिम भाववाढ इ. बाबींत वरील अधिकारी लक्ष घालून संबंधित व्यापारी लोकांना शिक्षा करत, त्यांच्यावर दंड बसवत. उत्तर पेशवाईत ही व्यवस्था पूर्णपणे कोलमडली. व्यापार व उद्योगास सुरक्षितता राहिली नाही. राज्यकर्त्यांनी संरक्षण दिले नाही, प्रोत्साहन दिले नाही. परिणामी मराठाकालीन व्यापार, उद्योग व व्यवसाय १९ व्या शतकाच्या प्रारंभी पूर्ण मोडून पडले. बसले.

**(ब) मराठेकालीन व्यवसाय :** मराठेकालीन व्यवसाय शेतीशी निगडित होते. कुटीर उद्योगाच्या स्वरूपात होते. यात विणकाम करणे, लाकूडकाम, लोखंड, पितळ, तांबे या धातूंचे व्यवसाय, सोने-चांदीचा व्यवसाय, बलुतेदारातील कुंभार, सुतार, लोहार इ. व्यवसाय, अलुतेदारांचे विविध कसबी व्यवसाय, मिठागरे, मासेमारी इत्यादी व्यवसायांचा समावेश होता. मराठा काळात महाराष्ट्र विणकर व्यवसायात प्रगत होता. साळी व कोष्टी या लोकांचा हा परंपरागत व्यवसाय. पेशवाईत बाहेरील प्रदेशातूनसुद्धा काही कुशल कारागीर मागवल्याचे संदर्भ मिळतात. उदा. उत्तरेतून खत्री, हैद्राबादहून मोमीन इ. त्या काळात महाराष्ट्रात साड्या, धोतरे, रेशीम वस्त्रे, कापड, पासोडी, पगड्या, कांबळी इत्यादींचे उत्पादन होत असे. महाराष्ट्रातील ग्रामीण समाज शेतीप्रधान असल्यामुळे लाकूड व्यवसायास महत्त्व प्राप्त झाले होते. शेतीसाठी लागणारी सर्व प्रकारची अवजारे, बैलगाड्या, घोडागाड्या, पालख्या, नावा, घरांची बांधणी, देव्हारे, लाकडी खेळणी इत्यादी वस्तू लाकडापासून बनविल्या जात होत्या आणि म्हणूनच गावगाड्यामध्ये सुतार हा ग्रामीण जीवनातील मूलभूत घटक होता. तसाच लोहार. शेती अवजारांचे फाळ, हत्यारे, शस्त्रास्त्रे, घोडा व बैल यांच्या पायाला मारावयाचे नाल, बैलगाडीच्या धावा, कोयते, खुरपी इ. कामे लोहार व घिसाडी करत. तांबट व कासार हे तांबे, पितळ, कासे इ. धातूंसंबंधीची कामे करत असत. ओतारी व सोनार सोन्या-चांदीचा व्यवसाय करत. पेशवाईत सोने, चांदीचा व्यवसाय तेजीत होता. सरदार, जहागीरदार व वतनदार यांची आर्थिक परिस्थिती या काळात चांगली होती. आपल्या वैभवाच्या, श्रीमंतीच्या प्रदर्शनासाठी लोक सोन्या-चांदीचे दागिने वापरत. त्यात बांगड्या, मंगळसूत्र, बाजुबंद, साखळ्या, बाळ्या, रिंगा, नथणी, नथी, तोडे, कडे इ. दागिन्यांचा समावेश होता. हे दागिने प्रामुख्याने सोनार तयार करीत असत. देव-देवतांच्या मूर्ती, मुखवटे, धातूच्या ओतकामातून बनणाऱ्या विविध वस्तू या सोनार व ओतारी बनवित असत. अशा प्रकारे मराठा काळात व विशेषतः १९ व्या शतकाच्या प्रारंभी महाराष्ट्रात विविध प्रकारचे कुटीरोद्योग व व्यवसाय चालत होते.

**(क) मराठेकालीन व्यापार :** पेशवेकालीन व्यापाराचे प्रमुख दोन भाग पडतात. अंतर्गत व्यापार व बाह्य व्यापार. अंतर्गत व्यापार तीन प्रकारांनी चालत असे. पश्चिम किनाऱ्यावरील व्यापार, नदीतून चालणारा व्यापार व जमिनीवरून चालणारा व्यापार.

Scanned with ACE Scanner

महाराष्ट्राच्या बाहेरून काही वस्तूंची आवक येथे होत असे. बंगालमधून तांदूळ, रेशीम, अफू, कागद, ताग व गोणपाट इत्यादी. हुबळी व गोव्यातून मीठ, कथील, पत्रा, नारळ, विड्याची पाने, पारा, केशर, मेणबत्ती इत्यादी. महाराष्ट्रातून तलम कापड, डिंक, लाख, धान्ये, मसाल्याचे पदार्थ इ. वस्तू बाहेर पाठविल्या जात असत.

**४. इंग्रजी राजवट व नवा आर्थिक दृष्टिकोण :** इंग्रज व्यापारी म्हणून प्रथम भारतात आले. व्यापारात स्थिर झाल्यानंतर आपले राज्य येथे प्रस्थापित करावे असे त्यांना वाटले. कारण येथील राजकीय, सामाजिक व आर्थिक परिस्थितीनेच त्यांना आमंत्रित केले. येथील राज्य स्थापनेसाठी असणाऱ्या परिस्थितीचा त्यांनी अचूक फायदा उठवला. महाराष्ट्रातसुद्धा वरीलप्रमाणेच घडले. प्रथम त्यांनी व्यापारावर आपली पकड बसवली. आर्थिक पाया भक्कम व स्थिर केला. व्यापार व वखारींच्या संरक्षणासाठी लष्कर उभे केले. इंग्रजांनी आपल्या वखारी व वसाहती यांना संरक्षणासाठी तटबंदी केली. युरोपमधील विज्ञान, तंत्रज्ञान यांच्या विकासामुळे सुबक वस्तू तयार होत. त्या त्यांनी भारतात आणल्या. येथे राजकीय सत्ता प्रस्थापित झाल्यानंतर आपल्या व्यापारास व उद्योगास अनुकूल असे राजकीय धोरण आखले व राबविले. त्यामुळे येथील परंपरागत बलुतेदार व अलुतेदारांचे व्यवसाय बसले. इंग्रजांच्या बरोबरीला स्पर्धेत ते टिकले नाहीत. जे टिकून राहिले त्यावर जादा कर बसवून इंग्रजांनी ते जाणीवपूर्वक मोडून काढले. या देशाला त्यांनी कच्च्या मालाचे कोठार व पक्का माल खपविण्याची हक्काची बाजारपेठ बनवली. संपत्तीचा ओघ भारतातून इंग्लंडकडे सुरू झाला. हा देश दरिद्री बनला. याला येथील सरदार, जहागीरदार, वतनदार व सावकार अपवाद होते. इंग्रजांनीसुद्धा त्यांना फारसे दुखावले नाही. पण त्यांना बेशिस्त वागूही दिले नाही.

इ. स. १८११ मध्ये एल्फिन्स्टन हा कर्तबगार अधिकारी इंग्रजांचा रेसिडेंट म्हणून पुण्यात आला. त्याने येथे शांतता व सुव्यवस्था निर्माण केली. दरोडेखोर, गुंड, पुंड, पेंढारी, लुटारू यांचा बंदोबस्त केला. कार्यक्षम न्यायव्यवस्था निर्माण केली. कायद्याचे राज्य प्रस्थापित केले. या बाबींमुळे इंग्रजी राजवटीविषयी आपुलकीची भावना लोकांमध्ये निर्माण झाली. इंग्रजांनी येथे आपले राज्य स्थिर करण्यासाठी नवे तंत्रज्ञान आणले. काही उद्योग व व्यवसाय येथे सुरू केले. प्रगत लष्करी शस्त्रास्त्रे, रस्ते, पोस्ट व शिस्त इ. क्षेत्रांतील सुधारणेमुळे येथील लोक भारावून गेले. इंग्रजांनी येथील विकासासाठी नवा आर्थिक दृष्टिकोण स्वीकारला.

**५. एल्फिन्स्टनचे नवे धोरण :** एल्फिन्स्टनने पुण्यात येऊन सत्ता आपल्या हातात घेतल्या-घेतल्या नवा आर्थिक दृष्टिकोण स्वीकारला. तो मुत्सद्दी, हुशार व दूरदृष्टीचा अधिकारी होता. त्याने महाराष्ट्रातील स्थानिक स्वराज्य संस्था, पंचायत राज्य यांचा विकास करण्याचे ठरविले. या पुरातन संस्थांत त्याला लोकशाहीची बीजे दिसली. त्याने समाज व शासन उपयोगी वतनदारांना बळ दिले. बाकीचे दुबळे बनवले. त्याने येथील वतनदार व शेतकरी यांच्या हक्कांचा समन्वय साधला. महाराष्ट्रातील समाजव्यवस्था व इतर सर्व बाबींचा बारकाईने अभ्यास करून सामान्य माणूस रयत, शेतकरी यांच्या हिताचे धोरण राबविण्यास सुरुवात केली व त्यासाठी पुढील सुधारणा घडवून आणल्या.

१. रयतवारी महसूल पद्धत सुरू केली.

२. महसुलाची १० वर्षांची सरासरी काढून तो निश्चित केला.

३. महसूल गोळा करण्यासाठी पाटलाची मदत घेण्याचे ठरविले.

४. फक्त लागवडीखालील जमिनीचाच शेतसारा वसूल करण्याच्या सूचना दिल्या.

५. रयतेस त्रासदायक असणारे कर रद्द केले.

६. पडीक जमीन लागवडीखाली आणण्यासाठी खास प्रयत्न करण्याचे आदेश कलेक्टरना दिले.

७. रयतेस करात सवलत देताना सर्व बाजूंचा बारकाईने विचार करूनच निर्णय घ्यावा.

अशा प्रकारे शेती व्यवसायाला व शेतकऱ्यांना पोषक असे आपले धोरण राबविण्यास सुरुवात केली. शेती व्यवसायास गतिमान केले. शेती व शेतकऱ्यांची परिस्थिती सुधारण्यासाठी प्रयत्न सुरू केले आणि म्हणूनच आधुनिक महाराष्ट्राचा पाया भक्कम करण्याचे काम एल्फिन्स्टनने केले असे म्हटल्यास अतिशयोक्ती ठरणार नाही.

१८ व्या शतकाच्या उत्तरार्धापासून १९ व्या शतकाच्या प्रारंभीच्या काळातील वरील सामाजिक, आर्थिक, धार्मिक व राजकीय जीवनाकडे पाहिल्यास महाराष्ट्रात इंग्रजांची राजकीय सत्ता प्रस्थापित होणे किती सहज शक्य झाले होते याची जाणीव होते. शिवकाळात आढळणारी ध्येयनिष्ठा व कर्तव्यबुद्धी शिवोत्तर काळात कमी होत गेली व पेशवेकाळात अखेरीस तिचा पूर्ण लोप झाला. समाजाच्या या अवनत अवस्थेत सत्तेवर आलेल्या अकार्यक्षम व नीतिहीन दुसऱ्या बाजीरावाने भर टाकली. धर्म व स्वातंत्र्य रक्षणासाठी इंग्रजांविरुद्ध सर्वांनी एकत्र यावे असे यशवंतराव होळकर आवाहन करीत असताना मराठ्यांच्या सत्तेचा प्रमुख असलेल्या दुसऱ्या बाजीरावाचा दैनंदिन कार्यक्रम काय होता ! लोकहितवादी लिहितात, "वाड्यात दोनतीनशे बायका नित्य न्हावयास येत असत. त्यांनी सकाळी न्हावयास प्रारंभ करावा तो प्रहर दिवसापर्यंत चाले, पंक्तिभोजनाचे समयी सर्व काळ बायका जवळ बसलेल्या असावयाच्या. आश्रित लोकांनी चार-पाच लग्ने करून घरी एक बायको ठेवावी आणि सरकारवाड्यात बाकीच्या बायका पाठवाव्यात. जो गृहस्थ वाड्यात बायको पाठविणार नाही त्याजवर श्रीमंतांची इतराजी व्हावयाची. त्यांनी (बायकांनी) आपल्या नवऱ्याकरिता श्रीमंतांना सांगून त्यास मामलती, कमाविशी वगैरे द्याव्या. त्यांजवर नवऱ्याचा हुकूम इतकाच की वाड्यात राहा आणि सरकारची मर्जी खुश करा. जेवून उठले म्हणजे पर्वतीस वगैरे दर्शनास आल्यावर शास्त्री, पंडित व भट यांची कचेरी होत असे. त्यापैकी कोणी म्हणावे, "बाजी हा कृष्ण अवतार आहे." कोणी म्हणावे, "शिवाचा अवतार प्रकटला आहे." वर्षातून सहा महिने या खाली जावयाचे अशा प्रकारे नीतिभ्रष्ट जीवन जगणारा, अनुष्ठाने, जपजाप्य, तंत्रमंत्र व ब्राह्मण भोजने याला राज्यकारभारापेक्षा जास्त महत्त्व देणाऱ्या दुसऱ्या बाजीरावाच्या काळात समाजाचा किंवा साम्राज्याचा विकास होणे अशक्यच होते." राज्यात शांतता, सुव्यवस्था निर्माण करावी, सैन्य

Scanned with ACE Scanner

उभारावे, मोहीम आखावी, व्यापार वाढवावा या महत्त्वपूर्ण राजकीय कार्यांकडे लक्ष न देता शिवाचा अवतार किंवा धर्मनिष्ठ राजा म्हणून उदोउदो करणाऱ्या परजीवोपजीवी भट-भिक्षुकांना भोजन घालण्यात व श्रावणमासात हजारो रुपयांची दक्षिणा वाटण्यात दुसऱ्या बाजीरावाने मराठ्यांच्या मुलूखगिरीवर मिळविलेल्या सुवर्णगंगेची विल्हेवाट लावली. सत्ताधीश म्हणून असलेल्या जबाबदारीची जाणही या पेशव्यांना नव्हती. त्यामुळे छत्रपती शिवाजी महाराजांनी प्रखर संघर्षातून उभारलेले स्वराज्य नष्ट झाले. त्याची वाताहत झाली.

समाजात वरिष्ठ मानला गेलेला ब्राह्मण वर्ग दुराचारी, यजमानाची स्तुती करण्यात, इतर जातींची नालस्ती व सर्व प्रकारचे मिथ्याचार करण्यात रममाण झाला. अधर्माला त्यांनी धर्माचे स्वरूप दिले. स्नानसंध्या, मंत्रपठण, अनुष्ठाने व सोवळेओवळे हाच त्यांचा धर्म बनला. अर्थाशिवाय मंत्रपठण हीच त्यांची विद्या तर संस्कृतशिवाय इतर भाषा दुय्यम मानणे हेच त्यांचे ज्ञान होते. म्हणूनच लोकहितवादी म्हणतात," भट व अतिशूद्रांत मला इतकेच अंतर दिसते की एक बोलका राघू व एक न बोलका राघू." अशा प्रकारे निःसत्त्व, विद्याहीन व स्वार्थांध बनलेल्या श्रेष्ठ जातीकडून समाजाला मार्गदर्शन होण्याची व त्यांच्या जीवनात बदल घडून येण्याची शक्यताच राहिली नाही. जी अवस्था पेशवे व ब्राह्मणांची तीच अवस्था सरदार, जहागीरदार व वतनदारांची होती. नीतिभ्रष्ट जीवन व व्यसनांधतेत हा वर्ग अखंड बुडाला होता. लोकहितवादी म्हणतात, इतके सरदार आहेत; त्यापैकी एकजणास आणून पाहिले की हा गृहस्थ कोणत्या उपयोगी पडेल ? तर मला वाटते की या पृथ्वीवर कोणतेही काम त्याचे लायक सापडावयाचे नाही. कारण की पंचवीस वर्षांपासून त्याचे वृद्धापकाळास आरंभ होतो. त्यामुळेच या वर्गाकडूनही काही बदल घडविला जाण्याची अपेक्षा नव्हती.

सावकारांनी दिलेली कर्जे बुडाली. व्यापाराला ओहोटी लागली. मुलूखगिरीद्वारे मिळणारा पैसा बंद झाला. कोरडवाहू शेतीतून पीक मोठ्या प्रमाणावर येईनासे झाले. शेतीतील उत्पन्न आपल्या घरात येईल अशी खात्री राहिली नाही. अनेक उद्योगधंदे बंद पडले. कारागिरांची वाताहत झाली. मराठ्यांना हिंदुपदपातशाहीचा संपूर्ण भारतभर प्रसार करायचा होता. तथापि, त्यासाठी आवश्यक असणारे आर्थिक स्थैर्य, प्रगत शस्त्रास्त्रे, भौतिक विद्येचे परिपूर्ण ज्ञान त्यांनी स्वीकारले नाही. मुस्लीम हे मराठ्यांपेक्षा मागासलेले व कर्तव्यशून्य असल्याने मराठ्यांना त्यांचा सहजपणे पराभव करता आला. युरोपीय राष्ट्रांमध्ये प्रबोधनाचे नवे युग सुरू झालेले असून ती राष्ट्रे या प्रगत आचार व विचारांनी समर्थ बनलेली होती. त्यांच्याबरोबरच्या संघर्षात मराठ्यांचा टिकाव लागला नाही. ते पराभूत झाले. सत्ता नष्ट झाली. राजकीय जीवनात अशांतता, गोंधळ, परस्पर संघर्ष, सामाजिक जीवनातील असमानता, आर्थिक जीवनातील दुरावस्था आणि अकार्यक्षम पेशवा व त्याचे भ्रष्ट प्रशासन यांमुळे दुसऱ्या बाजीरावाच्या राज्यकारभाराला समाज कंटाळला होता. त्यामुळेच दीर्घकालीन शांतता व सुव्यवस्था निर्माण करणाऱ्या इंग्रज शासनाचे समाजाने स्वागत केले. मराठ्यांचे स्वतंत्र राष्ट्र

नष्ट झाल्याबद्दल समाजाला फारसे दुःख वाटले नाही. ब्रिटिश राज्यकर्त्यांविषयी समाजाला आपलेपणा व विश्वास वाटू लागला.

ब्रिटिश राज्यकर्ते महाधूर्त, राजकारणी व मुत्सद्दी होते. त्यांनी आपला अंतस्थ हेतू समाजासमोर येऊ दिला नाही. याउलट, येथील सरदारांमध्ये परस्परांत संघर्ष वाढवून त्यांचे सामर्थ्य नष्ट केले. घरभेद्यांचा योग्य उपयोग करून घेतला. तैनाती फौजेचा स्वीकार करण्यास लावून येथील राज्यकर्त्यांना निःशस्त्र केले, अकार्यक्षम बनविले व सत्ता आपल्या ताब्यात घेतली. या सत्तांतराविषयी समाजात अशांतता किंवा विरोध निर्माण होणार नाही अशी त्यांनी काळजी घेतली. १८११ मध्ये पुण्याला ब्रिटिश रेसिडेंट म्हणून आलेल्या एल्फिन्स्टनने समाजात शांतता व सुव्यवस्था निर्माण केली. दरोडेखोर, पेंढारी, लुटारू यांचा बंदोबस्त केला. नागरिकांच्या जीविताला संरक्षण दिले. परस्परांमधील संघर्ष नष्ट केले. कायदा व न्यायदानाच्या बाबतीत समानता आणली. समाजातील विशिष्ट जातीचे न्यायालयीन विशेषाधिकार नष्ट केले. यामुळे समाजाला इंग्रजी सत्तेविषयी आपुलकीच वाटू लागली. आपण भारतातील मागासलेल्या, अप्रगत समाजाच्या प्रगतीसाठी व विकासासाठीच केवळ भारतात आलो आहोत असा त्यांनी प्रचार सुरू केला. एतद्देशीय सत्ताधीशांचा इंग्रजांनी केलेला पराभव पाहून व त्यांच्या प्रगतीने दिपून गेलेल्या समाजाचा या विधानावर विश्वास बसू लागला. इंग्रजांची सत्ता म्हणजे एक ईश्वरी संकेत आहे, ईश्वरी वरदान आहे असे समाजाला वाटू लागले. ख्रिश्चन मिशनऱ्यांच्या मदतीने त्यांनी येथील समाजात मानवता, समानता, भूतदया, परस्पर प्रेम याविषयींचा संदेश देणाऱ्या ख्रिश्चन धर्माचा प्रसार सुरू केला. रेल्वे, तारायंत्रे, पोस्ट, रस्ते यांद्वारे विश्वास संपादन केला. ब्राम्हण समाज

समाजात थोडासा बुद्धिमान व श्रेष्ठ वर्ग व्यापारी व ब्राह्मणांचा होता. व्यापाऱ्यांशी त्यांनी अगोदरपासूनच संधान बांधले होते. त्यामुळे त्यांचा विरोध झाला नाही. ब्राह्मणांसाठी असलेली श्रावणमासातील दक्षिणा एल्फिन्स्टनने चालू ठेवली. सुशिक्षित ब्राह्मणांना शासनात दुय्यम नोकऱ्या दिल्या. त्यांना निरनिराळी प्रलोभने दाखविली. त्यामुळे संतुष्ट झालेल्या या वर्गानेही इंग्रजांना विरोध केला नाही. इंग्रजांनी सत्तांतर झाले तरी धार्मिक जीवनात हस्तक्षेप न करण्याचे धोरण आखले, तशी घोषणाही केली. इंग्रजांना कल्पना होती की धार्मिक प्रेरणा कोणत्याही समाजात चेतना निर्माण करते. त्यामुळेच त्यांनी धार्मिक जीवनात व सामाजिक जीवनात आवश्यक वाटणाऱ्या सुधारणा करण्याचेही टाळले. प्रतिगामी व परंपरावादी घटकांचा पाठिंबा इंग्रजांना मिळाला. आपल्या राजकीय व आर्थिक साम्राज्यवादाचे स्वरूप समाजासमोर लगेच येणार नाही याची दक्षता इंग्रजांनी अतिशय मुत्सद्दीपणाने घेतली. त्यामुळेच येथील समाजाला आपण पारतंत्र्यात आहोत याची जाणीव लवकर होऊ शकली नाही. इंग्रजांना भारतावर पहिली शंभर वर्षे निश्चितपणे राज्य करता आले.

१९ व्या शतकाचा प्रारंभ ही नव्या युगाची पहाट होती. प्रबोधनाचे युग भारतात सुरू झाले. प्रगत आचार-विचार, भौतिक विद्या यांचे ज्ञान आत्मसात केलेल्या सुधारकांनी हे

Scanned with ACE Scanner

विचार समाजात रुजविण्यास प्रारंभ केला. परंपरेचा विशेष अभिमान असलेल्या समाजाला हे प्रगत नवज्ञान प्राप्त करण्याची जिज्ञासा निर्माण झाली. परंपरागत ज्ञान व ग्रंथप्रामाण्य; भौतिक विद्या व बुद्धिप्रामाण्य यांच्यातील संघर्षातूनच या सामाजिक सुधारणेच्या चळवळीला वाटचाल करावी लागली. त्यातूनच स्वातंत्र्य प्रेरणेचे स्फुल्लिंग निर्माण झाले व प्रदीर्घ काळ स्वातंत्र्यसंग्राम करण्याची जिद्द समाजात निर्माण झाली, म्हणूनच १९ व्या शतकाला महाराष्ट्राच्या इतिहासात एक नवे युग, नवा कालखंड म्हणून अनन्यसाधारण महत्त्व आहे.

Scanned with ACE Scanner